# महाराष्ट्र विधानपरिषद

## चौथे (हिवाळी) अधिवेशन, २०२०

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### विरार-अलिबाग मल्टीमोडल कॉरिडोरचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१) ४८३४ (२०-११-२०२०) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक २३४१ ला दिनांक ११ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेशातील (एमएमआर) वाहतूक कोंडी कमी करण्याच्या उद्देशाने शासनाने विरार-अलिबाग मल्टीमोडल कॉरिडोरचे (बहुउद्देशीय वाहतूक मार्गिका) काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत प्राधान्याने हाती घेण्याचा निर्णय सन २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मार्गिकेचे काम पूर्ण करुन उक्त मार्गिका माहे ऑगस्ट, २०२५ पर्यंत वाहतुकीकरिता सुरु करण्याचे नियोजन अंतिम टप्प्यात असतांना प्रस्तावित मार्गिकेमुळे पर्यावरणाचे नुकसान होणार असल्याकारणास्तव ४ वर्षे होऊनही उक्त मार्गिकेचे काम सुरु झाले नसल्याचे दिनांक ४ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकल्पाकरिता पर्यावरण, सीआरझेड, वने आणि वन्यजीवन विभागाच्या आवश्यक असणाऱ्या परवानग्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास प्राप्त झाल्या नसल्यामुळे संबंधित सर्व विभागांच्या परवानग्या प्राप्त करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) तसेच सदर प्रकल्पाचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाऐवजी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे (एमएसआरडीसी) सोपविण्यासंदर्भात दिनांक ७ जुलै, २०२० रोजीच्या एमएमआरडीएच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०४-१२-२०२०) :** (१), (२), (३) व (४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ०७ जुलै, २०२० रोजीच्या बैठकीत सदरहू प्रकल्पाची मालकी व अंमलबजावणीची जबाबदारी प्राधिकरणाने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास हस्तांतरीत करण्यास मान्यता दिलेली आहे. व त्यानुसार दिनांक १९/०८/२०२० रोजी मान्यतेनुसार बहुउद्देशीय मार्गिका प्रकल्पाची सल्लागार नेमणूक, अहवाल, टिप्पणी इत्यादी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे प्राप्त झाली आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत प्रकल्पाकरीता आवश्यक असणाऱ्या परवानग्याकरीता प्रस्ताव संबंधित कार्यालयास सादर करण्यात आले आहेत. सदर प्रकल्प म.रा.र.वि. महामंडळास दिनांक १९/०८/२०२० रोजी हस्तांतरीत झाला असून सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा म.रा.र.वि महामंडळाकडून करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सर्व शाळांना निवासी दराने वीज पुरवठा करण्याबाबत

**(२) ४९०७ (१३-११-२०२०) श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.कपिल पाटील, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक २४१ ला दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय/निमशासकीय मराठी, उर्दू व हिंदी अनुदानित व विनाअनुदानित सर्व शाळांना निवासी दराने वीज पुरवठा करण्याबाबत शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील शाळांना निवासी दराने वीज पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.नितिन राऊत (०३-१२-२०२०) :** (१) व (२) विद्युत अधिनियम, २००३ मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास ग्राहकांची वर्गवारी व त्याचे वीज दर निश्चित करण्याचे अधिकार आहेत. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिनांक ३०/०३/२०२० रोजीच्या वीज दर आदेशान्वये दिनांक ०१/०४/२०२० ते दिनांक ३१/०३/२०२१ पर्यंतच्या कालावधीकरिता निर्धारित केलेल्या वर्गवारीनुसार "लघुदाब-०७ (अ) सार्वजनिक सेवा-शासकीय शैक्षणिक संस्था व रुग्णालय" व "लघुदाब-०७ (ब) सार्वजनिक सेवा-अन्य" यांचेकरीता, २० किलोवॅट पर्यंत जोडभारकरीता अनुक्रमे रुपये ४.७६ प्रति युनिट व रुपये ६.३१ प्रति युनिट, २१ ते ५० किलोवॅट विद्युतभाराकरीता अनुक्रमे रुपये ६.३४ व रुपये ८.८९ प्रति युनिट तर ५० किलोवॅट पेक्षा जास्त विद्युतभाराकरीता अनुक्रमे रुपये ७.४६ व रुपये ९.२९ प्रति युनिट इतका वीज दर निर्धारित करण्यात आला आहे. उपरोक्त सार्वजनिक सेवा-शासकीय वर्गवारीतील वीज वापराचे दर निवासी ग्राहकांच्या दरापेक्षा कमी आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील वन खात्यातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३) ४९११ (१३-११-२०२०) श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वनरक्षक ते अप्पर प्रधान मुख्य वनरक्षक अशी वन खात्यातील महत्वाची हजारो पदे रिक्त असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन खात्यातील अनेक विभागात एका अधिकाऱ्याकडे दोन ते चार विभागाचा अतिरीक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे, वन विभागातील रिक्त पदांमुळे वन्य प्राण्यांची शिकार, खान आणि प्रकल्पाचे संकट, वणवा, अशा अनेक घटना घडत असल्याने वन कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाकडून विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य वन्यजीव महामंडळाच्या बैठकीत हा प्रश्न उपस्थित झाला असतांना मंडळाचे अध्यक्ष व मा.मुख्यमंत्री यांनी रिक्त पदे त्वरीत भरण्याचे निर्देश एका महिन्यापूर्वी देवूनही सदरहू रिक्त पदे भरण्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रिक्त पदे भरण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड (०३-१२-२०२०) :** (१) वन विभागातील भारतीय वन सेवेच्या महाराष्ट्र संवर्गात २०६ पदे मंजुर असून त्यापैकी १३३ पदांचा मंजुर आकृतिबंधात समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक ते उप वनसंरक्षक या ४ संवर्गातील १२ पदे रिक्त आहेत. या व्यतिरीक्त वन विभागाच्या नव्याने मंजुर आकृतिबंधानुसार विभागीय वन अधिकारी, सहायक वनसंरक्षक, वनक्षेत्रपाल, वनपाल व वनरक्षक या संवर्गातील एकूण मंजुर १४०९१ पदांपैकी १८५१ पदे रिक्त आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही. राज्य वन्यजीव मंडळाच्या दिनांक ०७ ऑगस्ट, २०२० रोजी संपन्न झालेल्या १५ व्या बैठकीत विषय क्र.३ मध्ये २०१९-२०२० सालच्या वन्यजीव संवर्धन व व्यवस्थापनामधील ठळक उपलब्धीबद्दलच्या चर्चेदरम्यान ताडोबा-अंधारी व्याघ्र राखीव क्षेत्राचे संरक्षणाचे बळकटीकरण करणे या अनुषंगाने विभिन्न संरक्षित क्षेत्रामध्ये वाढत्या मानव व वन समस्यांबाबत, क्षेत्रियस्तरावर परिणामकारक व्यवस्थापनाकरीता वनरक्षकांची वाढीव पदे निर्माण करण्याच्या गरजेबाबत चर्चा करण्यात आली. तथापि, वनरक्षकांची वाढीव पदे निर्माण करण्याबाबत कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. तसेच मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी बैठकीअंती दिलेल्या अतिरीक्त सूचनांमध्ये सुध्दा सदर बाब समाविष्ट नाही.

(४) केंद्रीय लोकसेवा आयोगाने निवड केलेल्या सन २०१९ च्या तुकडीतील ७ अधिकाऱ्यांचे इंदिरा गांधी राष्ट्रीय वन अकादमी, डेहराडूण येथे प्रशिक्षण चालू आहे. तसेच राज्य वनसेवेतील ११ अधिकाऱ्यांना भारतीय वनसेवेत पदोन्नती देण्यासंदर्भातील सन २०१९ च्या निवडसूचीचा प्रस्ताव केंद्रीय लोकसेवा आयोगास दिनांक ३० सप्टेंबर, २०२० रोजी पाठविण्यात आला आहे. तसेच विभागीय वन अधिकारी संवर्गातील ८ पदे, सहायक वनसंरक्षक संवर्गातील २५ पदे, वनक्षेत्रपाल संवर्गातील ५३ पदे पदोन्नतीने भरण्याची बाब कार्यवाहीत आहे. या व्यतिरिक्त वनपाल संवर्गातील पदे वनरक्षक संवर्गातून पदोन्नतीने भरण्याच्या सूचना क्षेत्रिय कार्यालयांना देण्यात आलेल्या आहेत. मा.उच्च न्यायालयाने दिनांक ०४ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाने दिनांक २९ डिसेंबर, २०१७ अन्वये मागासवर्गीय प्रवर्गातील अधिकाऱ्यांसाठी आरक्षित पदे रिक्त ठेवण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. वित्त विभाग, शासन निर्णय, दिनांक ०४ मे, २०२० अन्वये कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगामुळे अर्थव्यवस्थेवरील परिणामाबाबत केलेल्या उपाययोजनांच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारची नवीन पदभरती करण्यात येऊ नये, अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील दहावी व बारावीच्या परीक्षासंदर्भात निर्णय घेण्याबाबत

**(४) ४९१२ (१८-११-२०२०) श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर, श्री.नरेंद्र दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे फेब्रुवारी-मार्च मध्ये होणाऱ्या दहावी व बारावीच्या परीक्षांबाबत कोणताही निर्णय झाला नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरून घेण्याची प्रक्रिया सुरू झाली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियोजित वेळापत्रकानुसार माहे फेब्रुवारी किंवा मार्चमध्ये परिक्षा न घेता त्या काही महिने पुढे ढकलण्याच्या सूचना शिक्षण विभागाकडे येत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परीक्षांचे नियोजन करतांना सद्य:स्थितीत, पुढील वर्षाच्या वेळापत्रकावर होणारा परिणाम, सण, उत्सव, पाऊस अशा अनेक बाबींचा विचार करावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन परीक्षासंदर्भात निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली, तसेच शाळा-महाविद्यालये कधी सुरु करण्यात येणार आहेत व १० वी व १२ वी इयत्तेतील अनुत्तीर्ण आणि श्रेणी सुधारु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची फेर परीक्षा कधी घेण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०४-१२-२०२०) :** (१) होय.

आवेदन पत्र भरण्याची प्रक्रिया ही ऑनलाईन पध्दतीने होत असून सदर प्रक्रियेसाठी विद्यार्थी स्वत: शाळा/कनिष्ठ महाविद्यालय येथे हजर राहाणे आवश्यक असते व ही प्रक्रिया शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फतच पार पाडली जाते. आता माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये दिनांक २३ नोव्हेंबर, २०२० पासून प्रत्यक्ष सुरु झाली आहेत. परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रिया डिसेंबर महिन्यात सुरु करण्यात येईल.

(२) हे खरे आहे. २०२१ ची बोर्डाची परीक्षा कोविड प्रादुर्भावामुळे साधारणत: २ महिने पुढे ढकलण्याचे नियोजन आहे.

(३) होय.
(४) कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीमुळे अभ्यासक्रम २५% नी कमी करण्यात आला आहे. आता माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्‌यालये दिनांक २३ नोव्हेंबर, २०२० पासून प्रत्यक्ष सुरु झाली आहेत. इ.१० वी इ.१२ वी इयत्तेतील अनुत्तीर्ण आणि सुधारु इच्छिणाऱ्या विद्‌यार्थ्यांची फेरपरीक्षा दिनांक २१ नोव्हेंबर, २०२० ते दिनांक १० डिसेंबर, २०२० या कालावधीत आयोजित करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात भूमिगत वीज वाहिनीसाठी महावितरणकडून दुप्पट शुल्क आकारण्यात येत असल्याबाबत

**(५) ४९७० (१३-११-२०२०) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात भूमिगत वीज जोडणीच्या दरात वाढ करण्याबाबत राज्य वीज नियामक आयोगाने दिलेल्या आदेशातील आकड्यांच्या अवास्तविकतेमुळे व्यावसायिकांना भूमिगत वीज जोडणीसाठी ४ हजार रुपयांचा भुर्दंड पडत असून महावितरणने मात्र ही चूक दुरुस्त करण्याऐवजी त्याचा लाभ उठविण्याचे धोरण स्वीकारल्याची बाब दिनांक १५ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्य वीज नियामक आयोगाच्या आदेशात झालेली अडचण दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.नितिन राऊत (०३-१२-२०२०) :** (१) व (२) सर्व्हिस कनेक्शन शुल्क म्हणजे वितरणाच्या मुख्य वाहिनीपासून अर्जदारांच्या नियोजित जागेपर्यंत सर्व्हिस लाईन, मीटर, अर्थिंग बसविण्यासाठी तसेच सर्व आवश्यक साहित्यांच्या पुरवठयासाठी, (मीटरची किंमत वगळता) लागणारा खर्च, सर्व्हिस कनेक्शनचे

मूल्यांकन तांत्रिक मापदंड, सरासरी सर्व्हिस लाईन लांबी (२० मीटर), विद्युत भार मागणी इत्यादींवर आधारित आहे. महावितरणने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाला अंदाजपत्रक सादर करतांना, लघुदाब भूमिगत कनेक्शन ०-०.५ किलोवॅट व ०.५ ते ७.५ किलोवॅट विद्युतभार वर्गवारीसाठी आवश्यक केबल विद्युत भार क्षमतेनुसार घेण्यात आली आहे. आयोगाने दिनांक ०१/०४/२०२० पासून सुधारीत अनुसूचित दरास मंजूरी दिली आहे. आयोगाने ०.०५ किलोवॅट विद्युतभाराकरिता उपरी सर्व्हिस वाहिनीकरिता रुपये १२०० व भूमिगत सर्व्हिस वाहिनीकरिता रुपये ३४००/- तर ०.५ ते ७.५ किलोवॅट विद्युत भाराकरिता अनुक्रमे रुपये १७०० व रुपये ७६००/- इतके मंजुर केले आहेत.

केंद्रिय विद्युत प्राधिकरणाने उपरी आणि भूमिगत वीज नेटवर्कच्या वापरासाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी करतांना, या दोन यंत्रणांमधील तुलना दिली गेली आहे आणि उपरी वितरण प्रणालीपेक्षा भूमिगत वितरण प्रणालीस ४-५ पट अधिक खर्च येत असल्याचे नमूद केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात बनावट क्रीडा प्रमाणपत्रांव्दारे नोकरी मिळविलेल्या दोषी कर्मचाऱ्यांवर कारवाई करणेबाबत

**(६) ५०८४ (२०-११-२०२०) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पदक विजेते खेळाडूंना नोकरीमध्ये ५% आरक्षण असल्याचा फायदा घेवून सुमारे २०० हून अधिक उमेदवारांनी बनावट प्रमाणपत्रे काढून नोकरीचा लाभ घेतल्याबाबतचा चौकशी अहवाल क्रीडा उपसंचालक, औरंगाबाद यांच्या समितीने शासनाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अहवालाच्या अनुषंगाने बनावट प्रमाणपत्राच्या आधारे नोकरी मिळविणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने दोषींवर निलंबनाची कारवाई करुन फसवणुकीचे गुन्हे नोंदविण्यात आले आहेत काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (०२-१२-२०२०) :** (१) ट्रॅम्पोलिन व टंबलिग या खेळ प्रकारात २५८ जणांनी बनावट प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतल्या प्रकरणी अहवाल आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडे सादर झाला आहे.
(२) याबाबत आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्यास्तरावर चौकशी सुरु आहे. २५८ बोगस खेळाडू उमेदवारांबाबत नियुक्ती पत्र रद्द करुन, प्रतिक्षायादीतील पात्र उमेदवारांचा नियुक्तीसाठी विचार करण्याबाबत नियुक्ती प्राधिकरणास सूचित करण्याचे निदेश उपसंचालक, क्रीडा यांना दिले असून, याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महावितरण व टोरंट पॉवर कंपनीने आकारलेल्या वीज बिलांच्या वसुलीला स्थगिती देण्याबाबत

**(७) ५१२२ (१३-११-२०२०) अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महावितरण कंपनी व टोरंट पॉवर कंपनीने दिलेल्या अवास्तव वीज बिलांविरोधात संतप्त जनमताची दखल घेऊन वीज बिलांच्या वसुलीला तातडीने स्थगिती देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी (कोकण पदवीधर मतदार संघ) जिल्हाधिकारी, ठाणे यांना दिनांक १ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त मागणीनुसार वीज बिलांची वसुली थांबविण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.नितिन राऊत (०३-१२-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) ग्राहकांना वीज बिल भरणे सोयीचे व्हावे यासाठी महावितरणप्रमाणेच टोरंट पॉवर कंपनीतर्फे भिवंडी फ्रॅन्चाइझी विभागात अनेक उपाययोजना लागू करण्यात आल्या आहेत. उदा. माहे मार्च, २०२० चे वीज बिल भरणा करण्याची मुदत दिनांक १५/०५/२०२० पर्यंत व माहे एप्रिल, २०२० चे वीज बिल भरणा करण्याची मुदत दिनांक ३१/०५/२०२० पर्यंत कोणतेही व्याज अथवा विलंब शुल्क न आकारता वाढवून दिली होती. तसेच व्यापारी व औद्योगिक ग्राहकांचे, माहे एप्रिल, मे व जून, २०२० च्या वीज देयकामध्ये स्थिर आकार स्थगित करण्यात आले होते. तसेच ज्या ग्राहकांनी "लॉकडाऊन" कालावधीतील संपूर्ण वीज बिल (थकबाकीसह) देय दिनांकापर्यंत भरले आहे. त्यांना माहे जून-जुलै, २०२० च्या (ज्या महिन्यामध्ये मीटर वाचन उपलब्ध झाले असेल) वीज देयकाच्या रकमेच्या २% परतावा देण्यात आला व ज्या ग्राहकांना रिडींगचे बिल एकरकमी भरणे आर्थिकदृष्टया शक्य नाही अशा ग्राहकांना सदर वीज बिल तीन हप्त्यामध्ये भरण्याची सुविधा देखील उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे मे.टोरंट पॉवर कंपनीकडून भिवंडी फ्रॅन्चाइझी क्षेत्रातील सर्व ग्राहकांना लॉकडाऊन कालावधीत दिलेल्या बिलाबद्दल मार्गदर्शन व स्पष्टीकरण विविध माध्यमांव्दारे उदा.स्पेशल मिडियावरील व्हिडिओ, रहिवाशी सोसायटीमधील शिबिरे, वृत्तपत्रांचे लेख, वेबिनार इत्यादी व्दारे केले जात आहे.

---

## कोविड-१९ व लॉकडाऊनमुळे राज्यातील मजूर आणि कामगार बेरोजगार झाल्याबाबत

**(८) ५१२६ (१३-११-२०२०) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लक्षावधी मजूरांचे काम कोविड-१९ व लॉकडाऊनमुळे बंद झाल्याने त्यांच्या नोकऱ्या गेल्या आहेत तर हजारो कर्मचारी बेरोजगार झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची वस्तुस्थिती व आकडेवारी काय आहे,

(३) असल्यास, कामगारांच्या वेतनात अथवा मजूरीत कपात करण्यात येऊ नये किंवा त्यांना कामावरून कमी करण्यात येऊ नये, याबाबत शासनाने दिनांक ३१ मार्च, २०२० रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार कामगार आयुक्त कार्यालय व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयामध्ये नियंत्रण कक्ष स्थापन केले असून या नियंत्रण कक्षांमध्ये कामगारांना वेतन न देणे, कामावरुन कमी करणे अशा स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त झाल्याने लॉकडाऊन काळातील वेतन न दिल्याबाबत प्राप्त झालेल्या ८२६ तक्रारींमध्ये २७६२८ कामगारांना रु. ३८,३६,७५,१८१/- एवढी रक्कम थकीत वेतनापोटी मिळवून देण्यात आली तसेच श्रमिक रेल्वे सुरु झाल्यानंतर दिनांक १२ जून, २०२० रोजीपर्यंत ८३० विशेष श्रमिक रेल्वे गाड्यांनी एकूण ११,९७,१०४ कामगारांना त्यांच्या राज्यात पाठविण्यात आले आहे याबाबतची अद्ययावत माहिती काय आहे तसेच कोणताही लाभ न मिळालेल्या मजूर व कर्मचाऱ्यांना काम मिळवून देण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) असल्यास, आर्थिक सुधारणाबाबत शासनाने काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०३-१२-२०२०) :** (१) राज्यात कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार केंद्र व राज्य शासनाने लॉकडाऊन सुरु केल्याने अत्यावश्यक सेवा/उत्पादने वगळता इतर सर्व आस्थापना बंद ठेवण्यात आल्याने मजूरांचे काम बंद झाले आहे हे खरे आहे.

(२), (३) व (४) कामगारांच्या वेतनात अथवा मजूरीत कपात करण्यात येऊ नये किंवा त्यांना कामावरून कमी करण्यात येऊ नये याबाबत शासनाने दिनांक ३१/०३/२०२० रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. या

परिस्थितीत कामगारांच्या तक्रारीचे निवारण करण्याकरिता कामगार आयुक्त कार्यालय व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयामध्ये नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले होते.

सदर नियंत्रण कक्षामध्ये लॉकडाऊन काळात कामावरून कमी करणे तसेच वेतन अदा न करणे याबाबत १०६६ तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्यापैकी ८७७ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून ३५८८६ कामगारांना रुपये ५५,७२,०३,२६१/- एवढा आर्थिक लाभ मिळवून दिला आहे. तसेच, विशेष श्रमिक रेल्वे गाड्यांनी दिनांक १२/०६/२०२० रोजीपर्यंत एकूण १२,०१,२९७ कामगारांना त्यांच्या राज्यात पाठविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी योजनेचा लाभ देण्याबाबत

**(९) ५१३७ (१८-११-२०२०) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १ डिसेंबर, २०१८ रोजीपासून पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी योजनेची सुरुवात करण्यात आल्यानंतर या योजनेचा लाभ मिळण्यासाठी राज्यातील सुमारे ८८ लाख शेतकरी पात्र ठरलेले असून ५० टक्क्यांहून जास्त पात्र शेतकरी या योजनेच्या लाभापासून पूर्णत: वंचित राहिल्याचे माहे जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी योजनेत नोंदणी केलेल्या जिल्ह्यातील सुमारे २१ हजारांपेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या नावात झालेल्या त्रुटींची दुरुस्ती करुन शेतकऱ्यांना आर्थिक अनुदान वाटप करण्यात यावे, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, परभणी यांचेकडे सन २०२० मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तालुकानिहाय शिबिरे घेवून शेतकऱ्यांच्या त्रुटी दुरूस्ती करण्याबाबत जिल्हा प्रशासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, याबाबत थोडक्यात सविस्तर माहिती काय आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी योजनेचा लाभ मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०१-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

पी.एम.किसान पोर्टलवर दिनांक ३१ जुलै, २०२० रोजी एकूण १०५.१५ लाख शेतकऱ्यांची नोंदणी झाली होती. त्यापैकी एकूण ९२.६९ लाख लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळालेला आहे. तसेच दिनांक २४ नोव्हेंबर, २०२० अखेर एकूण ११२.१७ लाख शेतकऱ्यांनी नोंदणी केली असून त्यापैकी एकूण १००.८० लाख शेतकऱ्यांना रुपये ९३७६.४२ कोटी लाभ मिळालेला आहे. उर्वरीत लाभार्थ्यांपैकी पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(२) हे खरे नाही. तथापि, पी.एम. किसान योजनेंतर्गत लाभ मिळणेसाठी लाभार्थी यांनी दिलेले अर्ज संबंधित तहसिल कार्यालयाकडे कार्यवाहीस्तव पाठविण्यात येऊन कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(३) पी.एम.किसान योजनेंतर्गत परभणी जिल्ह्यातील पात्र लाभार्थी यांचे डाटा दुरुस्ती व नवीन लाभार्थी नोंदणी करणेबाबत विशेष मोहिम राबविण्यात आलेली असून दिनांक २३ जुलै, २०२० ते दिनांक ०५ ऑगस्ट, २०२० या पंधरवड्यात एकूण २५,७१२ आणि दिनांक ०५ नोव्हेंबर, २०२० ते दिनांक २० नोव्हेंबर, २०२० या पंधरवड्यात एकूण २,८८७ अशा एकूण २८,५९९ लाभार्थ्यांची दुरुस्ती करण्यात आलेली आहे. उर्वरीत पात्र लाभार्थ्यांची दुरुस्तीची कार्यवाही सुरु आहे.
(४) परभणी जिल्ह्यात पी.एम.किसान पोर्टलवर दिनांक २४ नोव्हेंबर, २०२० अखेर एकूण ३.११ लाख नोंदणी केलेल्या लाभार्थ्यांपैकी एकूण २.९६ लाख लाभार्थ्यांना रुपये २७६.७३ कोटी लाभ देण्यात आलेला आहे. उर्वरीत पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या नावाने गतवर्षी बनावट शासन आदेशाने अनुदान प्राप्त केल्याबाबत

**(१०) ५१७९ (१३-११-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.महादेव जानकर, डॉ.परिणय फुके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औरंगाबाद, बीड व लातूरमध्ये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या नावाने शासन निर्णय, क्र.इडीडी-२०१९/प्र.क्र.९१/अ.क.१, दिनांक ६ जून, २०१९ रोजी बनावट आदेश काढून त्याआधारे दिव्यांग शाळांनी गैरमार्गाने अनुदान प्राप्त केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिव्यांग शाळांनी गैरमार्गाने अनुदान प्राप्त केल्याची बातमी दैनिक लोकमत, नागपूर या वृत्तपत्रात दिनांक १३ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास प्रसिध्द झाली, असून या बातमीनुसार या विभागाच्या शासन निर्णय क्र.इडीडी-२०१९/प्र.क्र.९१/अ.क.१, दिनांक ६ जून, २०१९ रोजी बनावट शासन निर्णय काढण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या आदेशानुसार कोणताही लाभ दिला असल्यास त्याची वसुली करण्याचे व पुढील लाभ थांबविण्याचे आदेश दिव्यांग कल्याण आयुक्तांना दिल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या शाळा ज्या जिल्हयातील आहेत तेथील स्थानिक अधिकाऱ्यांनी या आदेशाची खात्री न करताच शाळांना लाभ दिले असल्याची बाब निदर्शनास आली असून असा बनावट आदेश काढून अनुदान लाटणाऱ्या व शासनाची फसवणूक करणाऱ्या शाळांवर तसेच बेजबाबदार अधिकाऱ्यांवर शासनाने चौकशी करून दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (०३-१२-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील औरंगाबाद, बीड व लातूर या जिल्हयांमध्ये दिनांक ०६/०६/२०१९ रोजी शासन निर्णय क्र.इडीडी-२०१९/प्र.क्र.९१/अपंग कल्याण-१ हा शासन आदेश बोगस काढल्याची बाब निदर्शनास आली आहे. परंतू बोगस आदेशातील दिव्यांग शाळांना शासनाकडून कोणतेही अनुदान अदा करण्यात आलेले नाही.

(२) होय.

(३) शासन पत्र दिनांक ०६/१०/२०२० अन्वये उक्त बोगस शासन निर्णयातील दिव्यांग शाळांना कोणताही लाभ अदा केला असल्यास त्याच्या वसुलीबाबत व भविष्यात कोणताही लाभ न देण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याकरिता आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांना कळविण्यात आले आहे.

(४) नाही.

आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांनी त्यांच्या दिनांक १५/१०/२०२० रोजीच्या आदेशान्वये जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जि.प.बीड, औरंगाबाद, उस्मानाबाद, लातूर यांना कार्यवाही करण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औरंगाबाद जिल्हयातील देवगिरी सहकारी साखर कारखान्याच्या जमिनीची कमी दरात विक्री झाल्याबाबत

**(११) ५२८९ (१३-११-२०२०) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील देवगिरी सहकारी साखर कारखान्याच्या मालकीची रुपये ४० कोटीची ४२ एकर जमीन रुपये ७.५ कोटीत औरंगाबाद मधील व्यावसायिकाला विक्री केल्याचे माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऋण वसुली न्यायाधिकरणाने या जमिनीचा थेट लिलाव न करता परस्पर विक्री व्यवहार झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०३-१२-२०२०) :** (१) होय.
(२) नाही, देवगिरी सहकारी साखर कारखान्याची मौ.चौका, ता.जि.औरंगाबाद येथील ४२ एकर जमिनीच्या विक्रीबाबत ऋण वसुली प्राधिकरणाच्या (DRT) आदेशानुसार टाईम्स ऑफ इंडिया व दैनिक सकाळ या वर्तमानपत्रात जाहीर निविदा प्रसिध्द केली होती. त्यास अनुसरून प्राप्त झालेल्या निविदांमधून सर्वात जास्त असलेल्या निविदेच्या रकमेस जमिनीची विक्री केली आहे. सबब सदर विक्री प्रक्रिया ही जाहीर निविदा न देता तसेच थेट लिलाव न करता परस्पर झालेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात शेतमाल खरेदी केंद्र सुरू करण्याबाबत

**(१२) ५३२४ (१३-११-२०२०) डॉ.रणजित पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कापूस, तूर, चना व अन्य शेतमालाची खरेदी केंद्र सुरू करण्याची घोषणा करण्यात आली असली तरी प्रत्यक्षात ठराविक ठिकाणी खरेदी केंद्रे उघडण्यात आली असल्याने शेतकऱ्यांना अनेक अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे तसेच चिखली (जि.बुलढाणा) येथील कापूस खरेदी केंद्र कमी असून जी केंद्र सुरू केली होती ती बंद झाली असून कापूस खरेदी केंद्र सुरू करावे अशी मागणी लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात खरीप हंगाम सुरू होणार असल्याने तत्पूर्वी बी-बियाणे खते यासाठी शासनाकडे पैसा असणे आवश्यक असल्याने शेतमालाची तात्काळ खरेदी होण्याच्यादृष्टीने मोठ्या प्रमाणात शेतमाल खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी दिनांक २१ एप्रिल, २०२० रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांना पत्राव्दारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लॉकडाऊनच्या काळात सुमारे दीड महिना कापसाची खरेदी बंद असल्यामुळे सुमारे सव्वादोन हजार कोटी रुपयांचा पन्नास क्विंटलहून अधिक कापूस शेतकऱ्यांच्या घरात पडून असल्याची बाब दिनांक १६ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली असून ३०६ बाजार समित्यांपैकी सुमारे २६०/२७० बाजार समित्यांमध्ये शेतमालाची खरेदी अत्यंत संथगतीने सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात विशेषत: जालना, बुलढाणा जिल्ह्यात कापसाचा हंगाम सुरु होणार असून कापसाला योग्य भाग मिळावा यासाठी त्याची सीसीआयलाच विक्री करावी अशी कापूस उत्पादक शेतकऱ्यांची मागणी असुन या मागणीची नोंद घेऊन शासनाने उपरोक्त मागणीसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने शेतमाल खरेदी केंद्र सुरू करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव उर्फ बाळासाहेब पाटील (०२-१२-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

हंगाम २०१९-२०२० मध्ये राज्यात केंद्र शासनाच्या मुख्य अभिकर्ता भारतीय कपास निगम लि., (CCI) यांच्या मार्फत एकूण ८९ खरेदी केंद्रावर एकूण १२८.११ लक्ष क्विंटल तर त्यांचे उपाभिकर्ता म्हणून महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाव्दारे एकूण ९१ खरेदी केंद्रावर एकूण ९३.८९ लक्ष क्विंटल कापसाची खरेदी झालेली आहे. चिखली, जि.बुलढाणा येथे एकच जिनिंग प्रेसिंग फॅक्ट्री असल्याकारणाने, गत हंगामात या खरेदी केंद्रावर CCI मार्फत एकूण २१८३ शेतकऱ्यांकडून ६५,२४४ क्विंटल कापूस खरेदी

करण्यात आलेला होता. तर, हंगाम २०२०-२०२१ मध्ये सीसीआयमार्फत सदर कापूस खरेदी केंद्रावर हमीभावाने कापूस खरेदीस सुरुवात केलेली असून दिनांक १/१२/२०२० पर्यंत एकूण ४२१० क्विंटल कापसाची खरेदी केलेली आहे.

हंगाम २०१९-२०२० मध्ये हमी दराने, नाफेड मार्फत तूर-१०८३५३.१८ क्विंटल व चना-२१२४९२६.८१ क्विंटल खरेदी केलेली आहे. सद्य:स्थितीत राज्यात मूग, उडीद व सोयाबिन यांची हमी भावाने खरेदी सुरु असून दिनांक २५/११/२०२० अखेर मूग-३४३४.६१ क्विंटल, उडीद-१४३.६० क्विंटल व सोयाबिन ३६.८७ क्विंटल खरेदी झालेली आहे.

श्रीमती श्वेता महाले, मा.वि.स.स., (चिखली) यांनी दिनांक १४/१०/२०२० रोजी पत्राव्दारे चिखली (जि.बुलढाणा) येथे कापूस खरेदी केंद्र सुरु करणेबाबतची मागणी केली आहे हे खरे आहे.

(२) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक २५ एप्रिल, २०२० च्या पत्रान्वये “कोरोना विषाणूच्या संबंधातील निकष पाळून शेतमालाची खरेदी शासकीय केंद्रावर जास्तीत जास्त प्रमाणात होण्याबाबतचे सर्वंकष धोरण घोषित करणेबाबत मा.मुख्यमंत्री यांना निवेदन सादर केले आहे.

(३) अंशत: खरे आहे.

कोविड-१९ या संसर्गजन्य आजाराच्या कारणास्तव लागू झालेल्या देशव्यापी टाळेबंदी पूर्वी (Pre Covid) दिनांक २४ मार्च, २०२० पर्यंत किमान हमी भावाने सीसीआयव्दारे एकूण ८५ कापूस खरेदी केंद्रांवर सुमारे ९१.९० लाख क्विंटल, तसेच महाराष्ट्र राज्य कापूस पणन महासंघाने एकूण ७४ केंद्रांवर एकूण ५४.०३ लक्ष क्विंटल कापूस खरेदी केलेली होती. कोविड-१९ आजाराच्या संक्रमणामुळे राज्यात दिनांक २४ मार्च, २०२० रोजी केलेल्या टाळेबंदीमुळे हमी दराने सुरु असलेली कापूस खरेदी केंद्र पूर्णतः बंद ठेवावी लागल्याने शेतकऱ्यांचा कापूस खरेदी करता आला नाही. परंतु केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाने लॉकडाऊनच्या कालावधीत शेतमालाची हमी भावाने खरेदी करण्यास परवानगी दिल्यानंतर, पुन्हा दिनांक २७/४/२०२० पासून (Post Covid) हमीदराने कापूस खरेदी केंद्र सुरु करण्यात आली होती. सीसीआयमार्फत लॉकडाऊनच्या कालावधीत एकूण ८९ कापूस खरेदी केंद्रावर (२३७ जिनिंग फॅक्ट्री) एकूण ३६.२१० लक्ष क्विंटल तसेच कापूस पणन

महासंघाव्दारे एकूण ९१ खरेदी केंद्रावर (१९२ जिनिंग फॅक्ट्री) ३९.८६ लाख क्विंटल कापसाची खरेदी केलेली आहे. अशा प्रकारे हंगाम २०१९-२०२० मध्ये एकूण २२२ लक्ष क्विंटल कापसाची हमी भावाने खरेदी केली आहे.

तसेच बुलढाणा जिल्ह्यात नोंदणी केलेल्या ५३३७४ शेतकऱ्याकडील १६,५३,६१४.२५ क्विंटल कापसाची हमी भावाने खरेदी केलेली असून केवळ मलकापूर व नांदुरा खरेदी केंद्रावरील ५९८४ शेतकऱ्यांकडील कापूस खरेदी पूर्ण होऊ शकली नाही.

(४) व (५) हंगाम २०२०-२०२१ मध्ये सीसीआयव्दारे एकूण ९० तर कापूस पणन महासंघाव्दारे एकूण ३६ कापूस खरेदी केंद्र सुरु करण्याचे नियोजित आहे. त्यापैकी बुलढाणा जिल्ह्यात सीसीआयव्दारे एकूण ५ व कापूस पणन महासंघाव्दारे एकूण ३ खरेदी केंद्र तर जालना जिल्ह्यात सीसीआयव्दारे ९ खरेदी केंद्रे सुरु करण्याचे नियोजित आहे. त्यानुसार दिनांक १/१२/२०२० पर्यंत बुलढाणा जिल्ह्यात ४ तर जालना जिल्ह्यात एकूण ९ कापूस खरेदी केंद्रावर कापूस खरेदी सुरु झालेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केंद्र शासनाच्या नव्या कामगार कायद्याची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत

**(१३) ५३३५ (१३-११-२०२०) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या नव्या कामगार कायद्याची राज्यात अंमलबजावणी केल्यास ५७०० पैकी केवळ १६०० कारखान्यांना कामगार कपात, टाळेबंदी किंवा कारखाना बंद करण्यासाठी शासनाची परवानगी घ्यावी लागेल त्याचप्रमाणे नोकरीतील शाश्वतीचा कायम (पर्मनंट) शब्दही नव्या कायद्यामध्ये नसल्याने कोणाला केव्हाही कामावरुन काढण्याचे सर्वाधिकार, उद्योजक, कारखानदारांना मिळणार असल्याने कामगारांच्या अस्तित्वाचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची भिती राज्याच्या कामगार विभागाने व्यक्त केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या सुधारित कामगार कायद्यांना राज्यात विरोध वाढत असल्याने शासनाने अंमलबजावणी प्रकरणी आपली भुमिका स्पष्ट करुन यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०३-१२-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाने संसदेत पारित केलेल्या चार कामगार संहितांची राज्यात अंमलबजावणी करण्यास दिनांक २०/१०/२०२० रोजी झालेल्या बैठकीत प्रमुख कामगार संघटनांच्या प्रतिनिधींनी विरोध दर्शविला आहे.
(२) केंद्र शासनाने संसदेत पारित केलेल्या चार कामगार संहितांबाबत संबंधित घटकांची (Stake Holders) मते जाणून घेऊन सदर संहितांच्या अंमलबजावणीबाबतचा निर्णय घेण्याची शासनाची भुमिका असून त्यानुसार दिनांक २०/१०/२०२० रोजी राज्यातील प्रमुख कामगार संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक मा.मंत्री (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेली आहे. याप्रकरणी अधिक चर्चा करुन शासनाची भुमिका स्पष्ट करण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अलिबाग (जि.रायगड) येथील माणगावच्या नाणारे गावातील बेलदार समाजाच्या कुटुंबाची वस्ती उठविण्यात येणार असल्याबाबत

**(१४) ५३४६ (१३-११-२०२०) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग (जि.रायगड) येथील माणगावच्या नाणारे गावात गत अनेक वर्षापासून वास्तव्य करणाऱ्या बेलदार समाजाच्या दिडशे कुटुंबाची वस्ती उठविण्यात येणार असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्हयातील माणगांव नगरपंचायत हद्दीत मोठया प्रमाणात वसलेल्या बेलदार समाजातील काही लोकांनी पक्की तर काहींनी कच्ची घरे बांधली असून उक्त बेलदार कुटुंबाकडून पूर्वी ग्रामपंचायत तर सध्याची माणगांव, नगरपंचायत कर वसूल करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गावात इंदिरा आवास योजनेची घरकुले देखील बांधण्यात आली असून इतरही आवश्यक सोयी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत असे असतानाही वन विभागाने या समाजाचे वास्तव्य अनधिकृत ठरविले असल्याने बेलदार समाजामध्ये संभ्रम निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड (०३-१२-२०२०) :** (१) मौजे नाणारे येथील अतिक्रमकांविरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९७२ च्या कलम ५३/५४ खाली सुनावणी होऊन प्राधिकृत अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, जं.का.स.सं/कॅम्पा, रोहा यांनी अतिक्रमण धारकांना दिनांक ३१/०१/२०२० रोजीच्या आदेशानुसार अतिक्रमण स्वखर्चाने हटविण्याबाबत आदेश दिले आहेत.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या जनहित याचिका क्र. ४२/२०१५ प्रकरणी दिनांक २२/०४/२०१९ च्या आदेशान्वये कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) माणगांव नगरपंचायत हद्दीतील सदर अतिक्रमण करुन बांधलेल्या घरांवर तत्कालीन ग्रामपंचायत व नगरपंचायतीव्दारे पक्क्या व कच्च्या घरांची महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम १८९ (अ) नुसार कर आकारणी करण्यात आलेली आहे.

(३) व (४) मौजे नाणारे येथील अतिक्रमकांना जागेच्या स्वामित्वाबाबत पुरावे सादर करण्यासाठी प्राधिकृत अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, जं.का.स.सं/कॅम्पा रोहा यांच्या कार्यालयात बोलविण्यात आले होते. सदरच्या अतिक्रमण धारकांना जागेच्या स्वामित्वाबाबत कुठलेही पुरावे सादर करता

आले नाहीत. सबब, सदर अतिक्रमण हटविण्यासाठी अतिक्रमकांविरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९७२ च्या कलम ५३/५४ खाली सुनावणी होऊन प्राधिकृत अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, जं.का.स.सं/कॅम्पा, रोहा यांनी अतिक्रमण धारकांना अतिक्रमण स्वखर्चाने हटविण्याबाबत आदेश दिले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धनगर समाजाच्या मागण्यांबाबत

**(१५) ५३७७ (१३-११-२०२०) श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबत विविध भागात धनगर समाजाकडून मोर्चा काढण्यात आला असून धनगर समाजाच्या आरक्षण व विविध मागण्यांबाबत शिष्टमंडळाने मा.मुख्यमंत्री महोदयांची भेट माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान घेतली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धनगर समाजाला आरक्षण देण्याची गेल्या अनेक वर्षापासून न्याय मागणी असून या मागणीच्या पूर्ततेसाठी धनगर समाजामार्फत सनदशीर मार्गाने प्रयत्न करण्यात आलेले असून त्यात आलेले अपयश, त्यामुळे धनगर समाजामार्फत राज्यात विविध ठिकाणी अनेकवेळा तीव्र स्वरुपाची आंदोलने केलेली असणे, त्यानुषंगाने या मागणीसंदर्भात महाराष्ट्र विधानपरिषद सभागृहात मा.मुख्यमंत्री यांनी घोषित केल्याप्रमाणे टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई या संस्थेस संशोधन करुन अहवाल सादर करण्यास दिनांक २२ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाने कळविलेले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार उक्त संस्थेने दिनांक ३१ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास शासनास अहवाल सादर केलेला असून अहवालाचे स्वरुप काय आहे व धनगर समाजाला आरक्षण व विविध मागण्यांच्या अनुषंनाने शासनाने चौकशी करुन आरक्षण देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (०१-१२-२०२०) :** (१) होय.

(२), (३) व (४) होय, धनगर व धनगड जमातींचा अभ्यास करुन अहवाल सादर करण्यासाठी येणाऱ्या खर्चाचा तपशील व संशोधनासाठी लागणारा कालावधी यांचा तपशील कळविण्याबाबत दिनांक २२ सप्टेंबर, २०१५ च्या पत्रान्वये टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई यांना विनंती करण्यात आली होती. तद्नंतर दिनांक १९ नोव्हेंबर, २०१५ च्या ज्ञापनान्वये सदर अभ्यासासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार सदर संस्थेने दिनांक ३१ ऑगस्ट, २०१८ रोजी त्यांचा अहवाल शासनास सादर केलेला होता. मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक २७/०२/२०१९ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई यांच्याकडून धनगर समाजाबाबत शासनास प्राप्त झालेल्या संशोधन/सर्वेक्षण अहवालाच्या अनुषंगाने धनगर समाजाच्या विविध मागण्यांवर विचार करण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार दिनांक १ मार्च, २०१९ च्या आदेशान्वये मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली. मंत्रिमंडळ उपसमितीच्या दिनांक २ मार्च, २०१९ रोजी झालेल्या बैठकीत देण्यात आलेल्या निर्देशानुसार धनगर समाजाबाबतचा टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई यांचा अहवाल महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे अभिप्रायांसाठी पाठविण्यात आलेला आहे.

---

## टीव्ही चॅनेलचा टीआरपी घोटाळयाबाबत

**(१६) ५३९७ (१८-११-२०२०) श्री.रविंद्र फाटक, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोलीस गुन्हे शाखेच्या विशेष पथकाने टीव्ही चॅनेलचा टीआरपी घोटाळा उघडकीस आणून फक्त मराठी, बॉक्स सिनेमा या वाहिन्यांच्या मालकांसह हंसा कंपनीचा मॅनेजरसह चौघांना अटक केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टीआरपी घोटाळ्यात सहभागी असलेल्या फक्त मराठी, बॉक्स सिनेमा आणि रिपब्लिक टीव्ही चॅनेल यांच्या बँक खात्यावरुन कोट्यवधींचे व्यवहार घडल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी पूर्ण होण्यास किती कालावधी लागणार आहे, सदर कामाची सद्य:स्थिती काय आहे, चौकशीच्या अनुषंगाने रिपब्लिक टीव्हीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना अटक करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (०३-१२-२०२०) :** (१) होय.
(२) गुन्हे प्रकटीकरण शाखा गु.र.क्र.१४३/२०२० या गुन्ह्याच्या अनुषंगाने झालेल्या आर्थिक व्यवहाराबाबतचा तपास करण्याकरिता आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांचे तपास पथक तयार करण्यात आले असून, सदर गुन्ह्याचे अनुषंगाने संशयितांचे व्यवहाराचे तपशिल बँकेकडून प्राप्त करुन घेण्यात येत असून सदर प्रकरणामध्ये अधिक तपास चालू आहे. तसेच मे.सरथ अँड असोसिएट्स या कंपनीची फॉरेन्सिक ऑडीटर म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.
(३) सदर प्रकरणाबाबत कांदिवली पोलीस ठाणे गु.र.क्र.८४३/२०२० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा तपास हा गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला असून सदर गुन्ह्याची गुन्हे शाखा येथे गु.र.क्र.१४३/२०२० अन्वये पुर्नोंदणी करुन गुन्ह्याचा तपास गुन्हे शाखा मुंबई यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

हंसा रिसर्च ग्रुप प्रा.लि. कंपनीचे रिलेशनशिप मॅनेजर विशाल वेदप्रकाश भंडारी व विनय राजेंद्र त्रिपाठी यांना अनुक्रमे दिनांक ०६/१०/२०२० व दिनांक १४/१०/२०२० रोजी अटक करण्यात आली आहे. फक्त मराठी चॅनेलचे मालक शिरीष पट्टणशेट्टी व बॉक्स सिनेमा चॅनेलचे मालक नारायण नंदकिशोर शर्मा यांना दिनांक ०८/१०/२०२० रोजी अटक करण्यात आली आहे. नमूद गुन्ह्यात १२ आरोपींना गुन्ह्यात अटक करण्यात आली असून त्यांच्याविरुध्द दिनांक २४/११/२०२० रोजी मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास कलम १७३(८) फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ऑनलाईन नोंदणी पेरे पत्रकाच्या अटीने शेतकरी अडचणीत आल्याबाबत

**(१७) ५४०५ (१३-११-२०२०) श्री.निलय नाईक, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोनाच्या संकटामुळे आधीच शेतकऱ्यांची परिस्थिती हलाखीची असताना शासकीय हमीभाव खरेदीसाठी शासनाने ऑनलाईन नोंदणी करताना पेरे पत्रकाची अट घातली असून त्यासाठी तलाठी शेतकऱ्यांकडून पैसे घेऊन त्यांना लुटण्याचे काम करीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कापूस, तूर, सोयाबीन हमीभाव खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणी सक्तीची केली असून शेतकऱ्यांच्या सातबारावर पेरे असल्याशिवाय नोंदणी करू नये असे आदेश दिले असल्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणीत भर पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जर सातबारावर नोंद नसेल तर त्याला ऑनलाईन पध्दतीने पीक विकता येणार नसून नोंदणी पत्रक भरण्याची जबाबदारी तलाठ्यांची असते परंतु त्यासाठी आर्थिक व्यवहार केल्याशिवाय नोंदणी करीत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांसाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०२-१२-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे ऑनलाईन नोंदणीसाठी पेरे पत्रकाची अट आहे. तथापि, पेरे पत्रकासाठी तलाठी शेतकऱ्यांकडून पैसे घेत असल्याचे निदर्शनास आले नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

कापसाची हमीभावाने खरेदी करण्यासाठी ऑनलाईन नोंदणी सक्तीची केलेली नाही. मात्र, तूर, सोयाबीनची हमीभावाने खरेदी करण्यासाठी ऑनलाईन नोंदणी सन २०१७-२०१८ पासून सक्तीची केलेली आहे.

(३) हे खरे नाही.

पेरेपत्रक अद्ययावत करुन ऑनलाईन उपलब्ध करुन देणे ही तलाठ्यांची जबाबदारी आहे. परंतू, आर्थिक व्यवहार केल्याशिवाय नोंदणी पत्रक तलाठ्याकडून भरले जात नाही, अशा प्रकारची तक्रार प्राप्त झालेली नाही. पेरेपत्रक प्राप्त करुन घेण्यासाठी तलाठीकडे जाण्याची आवश्यकता नाही. अद्ययावत पेरेपत्रक digitalsaatbara.mahabhumi.gov.in वेबसाईटवर तसेच मोबाईलवर या लिंकव्दारे प्राप्त करुन घेता येते.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महागाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील कृषी अवजार वाटपात अनियमितता झाल्याबाबत

**(१८) ५४०७ (१८-११-२०२०) श्री.निलय नाईक, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील दुकानांतील साहित्य वाटपाचे चौकशीचे आदेश जिल्हा कृषी अधीक्षक यांनी दिले असताना तालुका कृषी अधिकारी यांनी १००% चौकशी न करता फक्त दोन गावांची चौकशी केली असल्याने महागाव कृषी अवजार वाटपात अनियमितता झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाच्या चौकशी संदर्भात राजकीय दबाव आणून चौकशीकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोन गावांच्या चौकशीत कोणत्या प्रकारची माहिती समोर आली आहे, इतर सर्व १००% चौकशी कधीपर्यंत पूर्ण होणार आहे, तसेच संबंधित तालुका कृषी अधिकारी यांचेकडून विलंब होण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०३-१२-२०२०) :** (१) यवतमाळ जिल्हयातील महागाव तालुक्यातील वेणी व सवना या गावातील १००% लाभार्थ्यांची व तालुक्यातील इतर गावातील निवडक लाभार्थ्यांची यादृच्छिक पध्दतीने मोका तपासणी करण्यात आली. चौकशीमध्ये कोणत्याही प्रकाराची अनियमितता आढळून आलेली नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सिंदगी (ता.किनवट, जि.नांदेड) येथील वीज प्रवाह वारंवार खंडित होत असल्याबाबत

**(१९) ५४३० (१३-११-२०२०) श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.मोहनराव कदम, श्री.शरद रणपिसे, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंदगी (ता.किनवट, जि.नांदेड) येथे वीज सतत खंडीत होत असल्याने सामान्य नागरिक त्रासले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या पावसाळा सुरु असून पावसात वातावरण दमट असल्याने सरपटणाऱ्या प्राण्याची भिती अधिक असते असे असुनही विद्‌युत वितरण कंपनी ग्रामीण भागातील वीज पुरवठा सुरळीत करण्यास असमर्थ ठरत आहे तसेच पाळीव प्राण्यांना देखील सरपटणाऱ्या प्राण्यांचा धोका अधिक असतो या गोष्टी लक्षात घेता या प्रकरणी शासनाने वीज पुरवठा सुरळीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.नितिन राऊत (०३-१२-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

किनवट येथील १३२/३३ के.व्ही. अति उच्चदाब उपकेंद्रातून निघणाऱ्या ३३ के.व्ही. मांडवी फिडरची लांबी १२५ कि.मी. आहे. दिनांक ११/१०/२०२० रोजी रात्री २.३८ वाजता ३३ के.व्ही. मांडवी वाहिनीचे विद्युत तार तुटल्यामुळे वीज पुरवठा खंडीत झाला होता. सदर तुटलेले तार पूर्ववत जोडून त्या फिडरचा वीज पुरवठा त्याच दिवशी सकाळी ७.३६ वाजता सुरळीत करण्यात आला. रात्रीची वेळ असल्यामुळे सदर तुटलेले तार शोधून जोडण्यासाठी वेळ लागला. सद्य:स्थितीत सिंदगी येथील वीज पुरवठा सुरळीत चालू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## श्री.पी.व्ही.हरदास समितीच्या अहवालाची सकारात्मकरीत्या अंमलबजावणी करणेबाबत

**(२०) ५४५१ (१३-११-२०२०) श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सुजितसिंह ठाकूर : तारांकित प्रश्न क्रमांक ४४६ ला दिनांक २ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जमातीच्या ४७ लोकांना जात प्रमाणपत्र मिळण्याकरीता अनेक वर्षापासून येत असलेल्या अडचणींचा विचार करून शासनाने दिनांक १४ जानेवारी, २०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करुन पी.व्ही.हरदास (माजी न्यायाधीश मुंबई उच्च न्यायालय) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीचा अहवाल दिनांक ३१ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास शासनाला अवगत झालेला आहे, मात्र शासनाने सदर अहवालाची सकारात्मक व गंभीर दखल न घेतल्याने तसेच अंमलबजावणी न केल्याने जात प्रमाणपत्र मिळण्याच्या परिस्थितीत काही बदल झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक जिल्ह्यांमध्ये तरुण उमेदवारांना नोकरीकरिता जातीचे दाखले मिळत नसल्याने राज्यातील बेरोजगार उमेदवार आत्महत्या करण्यास प्रवृत्त होत असून राज्यातील अनुसूचित जमातीच्या लोकांमध्ये असंतोष पसरलेला असून शासनाने श्री.पी.व्ही.हरदास समितीच्या अहवालाची तातडीने पडताळणी करून अंमलबजावणी करण्याची अनुसूचित जमातीच्या लोकांकडून तसेच लोकप्रतिनिधींकडून सातत्याने मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर अहवालाची पडताळणी व अभ्यास करून अहवालाचे कायद्यात रूपांतर करून अंमलबजावणी करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (०१-१२-२०२०) :** (१) होय.

(२), (३), (४), (५) व (६) श्री पी.व्ही.हरदास यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीने त्यांचा अहवाल दिनांक २९ मे, २०१९ रोजी शासनास सादर केला आहे. सदर अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने कायदेशीर बाबी संदर्भात विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्यात आले आहेत. सदर अहवालातील शिफारशी ह्या सामाजिक न्याय विभाग व बहुजन कल्याण विभागाशी देखील संबंधित असल्याने त्यांचे अभिप्राय घेण्यात येत आहेत. सदर अभिप्राय प्राप्त झाल्यावर शिफारशींवर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

## आदिवासी जॉबकार्डधारक मजुरांना खावटी योजनेचा लाभ देण्याबाबत

**(२१) ५४९६ (१३-११-२०२०) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १ एप्रिल, २०१९ पासून पुढील वर्षभरात एक दिवस मनरेगावर काम केले असले तरच खावटीचा लाभ दिला जाईल अशी अट घालण्यात आल्यामुळे आदिवासी जॉबकार्डधारक मजुरांना खावटीच्या लाभापासून वंचित राहावे लागणार असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामपंचायतींनी वर्षभरात मनरेगाची कामे उपलब्ध करुन दिली नसल्याने अशावेळी एक दिवस काम केल्याचा दाखला कशाप्रकारे मिळेल, असा प्रश्न मजुरांना पडला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मनरेगावरील मजुरांसाठीचा निकष शिथिल करुन खावटीचा लाभ देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व मजुरांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (०३-१२-२०२०) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

राज्यात कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर उद्‌भवलेल्या परिस्थितीमध्ये ११.५५ लक्ष अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना सहाय्य करण्यासाठी खावटी अनुदान योजना सुरु करण्याबाबत मा.मंत्रिमंडळाने दिनांक १२ ऑगस्ट, २०२० रोजीच्या मा.मंत्रिमंडळ बैठकीमध्ये निर्णय घेतलेला आहे. त्याबाबतचा शासन निर्णय दिनांक ०९/०९/२०२० रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. तसेच योजना राबविण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना दिनांक ३०/०९/२०२० रोजी निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. शासन निर्णय दिनांक ०९/०९/२०२० अन्वये खावटी अनुदान योजनेंतर्गत खालील लाभार्थ्यांना लाभ अनुज्ञेय आहे.

| अ.क्र. | तपशील | कुटुंब संख्या |
|---|---|---|
| १ | मनरेगावर एक दिवस कार्यरत असलेले आदिवासी मजूर (दिनांक एप्रिल, २०१९ ते ३१ मार्च, २०२० या कालावधीत) | ४,००,००० |
| २ | आदिम जमातीची सर्व कुटुंबे. | २,२६,००० |
| ३ | पारधी जमातीची सर्व कुटुंबे. | ६४,००० |
| ४ | जिल्हाधिकारी यांच्या सल्ल्याने प्रकल्प अधिकारी यांनी निश्चित केलेली गरजू आदिवासी कुटुंबे ज्यामध्ये परितकत्या, घटस्फोटीत महिला, विधवा भूमिहीन शेतमजूर, अपंग व्यक्ती असलेले कुटुंब, अनाथ मुलांचे संगोपन करणारे कुटुंब. | ३,००,००० |
| ५ | वैयक्तिक वनहक्क प्राप्त झालेली वनहक्कधारक कुटुंबे. | १,६५,००० |
| एकूण :- | | ११,५५,००० |

दिनांक १ एप्रिल, २०१९ पासून पुढील वर्षभरात अनुसूचित जमातीतील लाभार्थी एक दिवस मनरेगावर काम केले नसले तरी उपरोक्त तपशिलातील उर्वरित घटकामध्ये लाभधारक ठरु शकतात. त्यामुळे सदर लाभधारकाला खावटी योजनेचा लाभ दिला जाईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भंडारा जिल्हा अधीक्षक कृषी कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२२) ५५१४ (१८-११-२०२०) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, भंडारा या कार्यालयात अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांची संख्या वाढत असून कोरोना संकटात कर्मचारी तणावात काम करताना दिसत आहे, अकरा कृषी अधिकाऱ्यांसह १७३

कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्यामुळे शंभरच्यावर योजनांची अंमलबजावणी करतांना कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण येत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, भंडारा या कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०३-१२-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, भंडारा कार्यालयाच्या अधिनस्त कृषी विभागात गट-अ ते गट-ड संवर्गाची ४३५ पदे मंजूर असून त्यापैकी २७९ पदे भरलेली आहेत व १५६ पदे रिक्त आहेत. शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संबंधित असणाऱ्या तांत्रिक संवर्गातील कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक, मंडल कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी व गट-अ मधील एकूण २५२ मंजूर पदे असून त्यातील १९९ पदे भरलेली तर केवळ ५३ पदे रिक्त आहेत. रिक्त असणाऱ्या पदांचा कार्यभार इतर अधिकारी/कर्मचारी यांच्याकडे सोपविण्यात आलेला असून त्यांच्यामार्फत शेतकऱ्यांना शासनाच्या सर्व योजनांचा लाभ देण्याबाबत वेळोवेळी सूचना करण्यात येत आहे.

(२) जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भंडारा कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केल्याबाबतचे निवेदन आढळून आलेले नाही.

(३) शासनाच्या शेतकरी हिताच्या योजना जनतेपर्यंत पोहोचण्याची कामे मुख्यत: तांत्रिक संवर्गातील अधिकारी/कर्मचारी करतात. वित्त विभाग, शासन निर्णय, दिनांक १६ मे, २०१८ नुसार कृषी विभागातील तांत्रिक संवर्गातील १०० टक्के पदभरतीस मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत तांत्रिक संवर्गातील गट-अ व गट-ब मधील पदांसाठी शिफारस करण्यात आलेल्या ३९९ अधिकाऱ्यांना फेब्रुवारी, २०२० मध्ये पदस्थापना दिलेल्या आहेत. कृषी सेवकांच्या १४१६ पदांची पदभरती अंतिम टप्प्यात

असून निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्याची कार्यवाही संबंधित विभागीय कृषी सहसंचालक यांचेस्तरावर सुरू आहे. संचालक संवर्गातील ३ पदांवर दिनांक १९ नोव्हेंबर, २०२० रोजी पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आलेली आहे. गट-अ व गट-ब संवर्गातील पदोन्नती कोट्यातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही विभागामार्फत सुरू आहे. तांत्रिक संवर्गातील पदे प्रामुख्याने भरण्यात आलेली असून प्रशासकीय संवर्गातील पदे भरण्यावर वित्त विभागाच्या दिनांक ४ मे, २०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार निर्बंध असल्याने तुर्तास सदर पदे भरता येणार नाहीत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जालना जिल्ह्यातील सोयाबीन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत

**(२३) ५५३२ (११-११-२०२०) श्री.विनायकराव मेटे, श्री.राजेश राठोड, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पेरणी केलेले सोयाबीन उगवले नसल्यामुळे सोयाबीन बियाणे उगवण न झाल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून प्राप्त झाल्या, ज्या शेतकऱ्यांकडून तक्रारी आलेल्या आहेत त्यांच्या पेरणी क्षेत्राची पाहणी व पंचनामा करून फक्त बियाणे दिले गेले, परंतु नुकसान भरपाई देण्यात आली नसल्याचे माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मंठा व परतूर (जि.जालना) तालुक्यात सन २०२० या हंगामात सोयाबीनची ९० टक्के दुबार पेरणी करावी लागली तद्‌नंतरही सोयाबीनची ४० टक्के उगमक्षमता कमी झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बोगस बियाणे उत्पादक/विक्री करणाऱ्या कंपनीवर कारवाई करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२७-११-२०२०) :** (१) जालना जिल्ह्यात सोयाबीन बियाणांच्या उगवण शक्तीबाबत एकूण २७४० प्राप्त तक्रारी पैकी २६७३ तक्रारी सदोष असल्याचे तालुकास्तरीय समितीने अहवाल दिला आहे.

(२) हे खर आहे.

मंठा तालुक्यामध्ये खरीप २०२० मध्ये सोयाबीन पिकाखालील एकूण क्षेत्र २९७५० हेक्टर होते. त्यामध्ये सदोष बियाण्यामुळे दुबार पेरणीचे क्षेत्र ९३१.४० हेक्टर होते. तालुक्यातील सोयाबीन पिकाचे दुबार पेरणीचे क्षेत्र हे एकूण क्षेत्राच्या ३.१३ टक्के आहे.

परतूर तालुक्यामध्ये खरीप २०२० मध्ये सोयाबीन पिकाखालील एकूण क्षेत्र १८३८९ हेक्टर होते. त्यामध्ये सदोष बियाण्यामुळे दुबार पेरणीचे क्षेत्र ९८२.२२ हेक्टर होते. तालुक्यातील सोयाबीन पिकाचे दुबार पेरणीचे क्षेत्र हे एकूण क्षेत्राच्या ५.३४ टक्के आहे.

(३) शेतकऱ्यांना नुकसान भरपाईबाबत जिल्हा ग्राहक मंचाकडे दावा दाखल करणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे. जालना जिल्ह्यात महाबीज मार्फत रुपये ४,१५,१४०/- रोख स्वरुपात तसेच खाजगी कंपन्यामार्फत रुपये ३,२५,६१०/- रोख स्वरुपात नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे. तसेच बियाणे स्वरुपात १७.४० क्विंटल नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे.

सदोष बियाणे आढळून आलेल्या १५ कंपनीविरुध्द १० पोलीस गुन्हे दाखल केले असून बियाणे अधिनियमातील तरतूदीनुसार अप्रमाणित बियाणेबाबत ३३ न्यायालयीन दावे दाखल करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांचे नवीन अंशदान पेन्शन योजनेची रक्कम जमा करणेबाबत

**(२४) ५५५५ (१३-११-२०२०) श्री.बाळाराम पाटील, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत चालविण्यात येत असणाऱ्या आश्रमशाळेतील दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर नियुक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना नवीन अंशदान पेन्शन योजना लागू केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर नियुक्त कर्मचारी यांचा शासनाचा हिस्सा इतर विभागातील कर्मचारी यांच्या खात्यावर जमा केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, इतर मागास बहुजन कल्याण विभागातील आश्रमशाळेतील कर्मचारी यांचा हिस्सा अजूनही जमा केला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन इतर मागास बहुजन कल्याण विभागातील आश्रमशाळेतील कर्मचारी यांचा नवीन अंशदान पेन्शन योजनेचा शासनाचा हिस्सा जमा करणेबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (०३-१२-२०२०) :** (१) होय.
(२) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(३) व (४) याबाबत शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी यांच्या नवीन अंशदान पेन्शन योजनेनुसार शासनाचा हिस्सा जमा करण्याकरिता नवीन लेखाशिर्ष घेण्यात आले असून त्या अंतर्गत वित्त विभागाकडून निधी उपलब्ध करून घेण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच याबाबत उपाययोजना करण्यासाठी संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सुर्यफुल पिकाला पीक विमा योजनेतून वगळल्याबाबत

**(२५) ५५५६ (२०-११-२०२०) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या कृषी विभागाने चालू हंगामात सुर्यफुल पिकाचा समावेश पीक विमा योजनेतून वगळला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुर्यफुल पिकाला पीक विमा योजनेतुन वगळण्यासाठी कोणते निकष लावले आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सुर्यफुल पिकाला पीक विमा योजनेमध्ये सामावून घेणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२६-११-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) राज्यात एकूण पिकांच्या सर्वसाधारण पेरणी क्षेत्रापेक्षा सुर्यफुलाचे क्षेत्र अत्यल्प आहे. त्यामुळे योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार प्रत्यक्षात पीक नसल्यामुळे निर्धारित संख्येइतके पीक कापणी प्रयोग होऊ शकत नाहीत. मात्र, याच पिकामध्ये मोठया प्रमाणात विमा संरक्षित क्षेत्र असल्याचे निदर्शनास आल्याने तसेच कोणताही Insurable Interest (विमा योग्य नफा) नसतांना राज्य-केंद्र शासनास मोठ्या प्रमाणात विमा हप्ता अनुदान दयावे लागत असल्याने खरीप हंगाम २०२० पासून सुर्यफुल हे दुय्यम पीक प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत अधिसूचित करण्यात आले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## समृध्दी महामार्ग (ता.वैजापूर, जि.औरंगाबाद) येथील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(२६) ५५५९ (२०-११-२०२०) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) समृध्दी महामार्गावरील बोरदहेगाव शिवारातील जुने पालखेड, दहेगाव व सटाणा (ता.वैजापूर, जि.औरंगाबाद) या गावाजवळ कंत्राटदाराने माती व मुरुमाचा भराव टाकून महामार्गाची उंची ६ मीटर वाढवून सिमेंट कॉंक्रीटीकरण करण्याचे काम पूर्ण केले असून ज्या ठिकाणी पुलाचे काम करण्यात आले आहे त्या पुलाखालची माती आणि मुरुमाचा भराव पावसाच्या पाण्याने मोठ्या प्रमाणात वाहून गेल्याने रस्त्याला मोठमोठया भेगा पडल्याचे माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समृध्दी महामार्गाच्या ५७ कि.मी. कामासाठी गौण खनिज व बांधकाम साहित्यांच्या जड वाहतुकीमुळे वैजापूर तालुक्यातील २०० कि.मी. रस्त्यांची दुरवस्था झाली असून सदर रस्त्यांची दुरुस्ती कंत्राटदाराने करुन देण्याची हमी ६ महिन्यापूर्वी दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नमूद सर्व रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-१२-२०२०) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती महामार्ग (हिंदू ह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्ग) पॅकेज-१० कि.मी. ४४४/८४५ ते ५०२/७५२ (भाग: फतियाबाद ते सुराळा) ता.वैजापूर/गंगापूर, जि.औरंगाबाद चे काम, या कामाचे ठेकेदार मे.एल अॅण्ड टी यांचेमार्फत ई.पी.सी. तत्वावर प्रगतीपथावर असून या कामामध्ये नियमानुसार व आवश्यक प्लॅन, प्रोफाईल नुसार (Embankment) माती भरावाची उंची करण्यात येत आहे. सदर रस्त्याचा भराव आवश्यक रुंदी पेक्षा जास्त रुंदीचा करण्यात येतो. तद्नंतर आवश्यक रुंदीपेक्षा जास्त भागाचे आवश्यकतेप्रमाणे सेक्शनिंग करुन १:२ उतार देण्यात येत आहे. माती भरावाच्या नंतर कॉयर मॅटिंग किंवा टर्फिंग (Coir matting or Turfing) करण्यात येणार आहे. भरावाच्या सेक्शनिंगचे काम व कॉयर मॅटिंग किंवा टार्फिंगचे काम नंतर करावयाचे असल्यामुळे पावसामुळे भरावास काही ठिकाणी भेगा पडलेल्या होत्या. आता, पावसाळा संपल्यानंतर भरावाच्या सेक्शनिंग व रोलिंग करुन त्यास योग्य उतार देण्याचे काम प्रगतीपथावर आहे व नंतर त्यावर कॉयर मॅटिंग किंवा टार्फिंगचे काम करण्यात येणार आहे.
(२) होय, अंशत: खरे आहे.

ता.वैजापूर व गंगापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यातून जाणाऱ्या नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती महामार्ग पॅकेज १० कि.मी. ४४४/८४५ ते ५०२/७५२ (भाग : फतियाबाद ते सुराळा) या भागाचे काम करतांना, समृध्दी महामार्गाच्या आजुबाजुचे परिसरातील रस्ते, गौण खनिज व बांधकाम

साहित्याची वाहतूक करणेसाठी काही प्रमाणात महामार्गाचे ठेकेदार मे.एल ॲण्ड टी यांचेमार्फत वापरण्यात येत आहेत. कामाच्या करारनाम्यातील अटी व शर्तीस अनुसरुन, समृध्दी महामार्गाचे काम करताना वापरात असलेले रस्ते वाहतुकीमुळे खराब झालेत, रस्त्यांची दुरुस्ती महामार्गाचे ठेकेदार मे.एल ॲण्ड टी यांनी करुन देणे, ठेकेदारास बंधनकारक आहे व तशी आवश्यकते प्रमाणे दुरुस्ती, ठेकेदार मे.एल ॲण्ड टी यांचेमार्फत करण्यात येत आहे व भविष्यातही महामार्गाचे काम चालू असेपर्यंत सदर आजुबाजुच्या रस्त्यांचा वापर ठेकेदार मे.एल ॲण्ड टी यांचेकडून झाल्यास त्या रस्त्यांची दुरुस्ती ठेकेदार मे.एल ॲण्ड टी यांचेमार्फत करण्यात येईल.

(३) सदर महामार्गाच्या कामासाठी नियुक्ती करण्यात आलेल्या ठेकेदारांसमवेत करण्यात आलेला करारनाम्यातील आर्टिकल (९.१) नुसार महामार्गाच्या कामासाठी महामार्गाच्या परिसरातील ज्या रस्त्यांचा वापर वाहतुकीसाठी करण्यात येत असेल व असे रस्ते नादुरुस्त झाले असल्यास, त्या रस्त्यांची दुरुस्ती करुन नादुरुस्त रस्ते संबंधित ठेकेदाराने सुस्थितीत ठेवावयाचे आहेत. त्यानुसार ठेकेदार कार्यवाही करित असून, नादुरुस्त झालेले रस्ते दुरुस्त करण्यात येत आहेत. तसेच यापुढे नादुरुस्त होणाऱ्या रस्त्यांची दुरुस्ती तातडीने करण्याबाबत ठेकेदारांना निर्देश देण्यात आले आहेत.

सबब चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेंतर्गत मिळणाऱ्या अनुदानाबाबत

**(२७) ५५९० (१८-११-२०२०) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १४ जिल्हयातील १४९ अवर्षण प्रवण तालुक्यात मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेंतर्गत अल्प भूधारक शेतकऱ्यांना ८०% तर इतर शेतकऱ्यांना ७५% अनुदान दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत एक लाखाहून अधिक शेतकऱ्यांना अनुदान मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अनुदानासाठी केंद्र शासनाने दिलेल्या रुपये १२० कोटीचा हिस्सा राज्य शासनाने इतरत्र खर्च केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०३-१२-२०२०) :** (१) होय, त्यासाठी राज्य शासनाने मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे.
(२) सन २०१९-२०२० या वर्षात सुक्ष्म सिंचन संचाची उभारणी करुन अनुदानासाठी प्रस्ताव सादर केलेल्या १४६१६५ शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत देय अनुदानाची रक्कम जमा करण्यात आली आहे. उर्वरित शेतकऱ्यांना अनुदानाचे वाटप करण्यात येत आहे.

कोविड-१९ या संसर्गजन्य रोगामुळे उद्‌भवलेल्या आर्थिक परिस्थितीमुळे राज्य शासनाकडून पूरक अनुदानासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करुन देणे शक्य झाले नाही. सदर निधी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) नाही, शासनाने केंद्र हिश्श्याचा संपूर्ण निधी समरुप राज्य हिश्श्याच्या निधीसह वितरित केला आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## केज (जि.बीड) येथील नायब तहसिलदारांच्या बदलीबाबत

**(२८) ५६३३ (२०-११-२०२०) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज (जि.बीड) येथील नायब तहसिलदार गेली २३ वर्षांपासून केज येथील विविध विभागात तर कधी नगरपंचायतमध्ये पदभार घेवून वर्षानुवर्षे काम करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नायब तहसिलदारांच्या विरोधात तक्रारी व वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी असल्याने त्यांची बदली करण्यात यावी, यासाठी केज येथील ग्रामस्थांनी दिनांक २४ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास तहसिल कार्यालयासमोर आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (०३-१२-२०२०) :** (१), (२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.

केज तहसिल कार्यालयामध्ये अनेक वर्षापासून विविध पदावर कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या बदल्या करण्यात याव्यात अन्यथा दिनांक २४/०८/२०२० रोजी विविध संघटना आंदोलन करतील असे काही संघटनांनी निवेदन दिलेले होते. त्यानुसार सदर संघटनांनी दिनांक २४/०८/२०२० रोजी आंदोलन केले व त्याच दिवशी ते आंदोलन माघारी घेण्यात आले आहे. सदर आंदोलनामध्ये केज ग्रामस्थ समाविष्ठ नव्हते.

जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांचे पत्र दिनांक २४/०८/२०२० नुसार शासन निर्णय दिनांक ०७/०७/२०२० मधील तरतूदीनुसार १५ टक्के बदल्या करण्याचे शासनाचे निर्देश विचारात घेता श्री.सचिन देशपांडे, नायब तहसिलदार (निवडणूक), तहसिल कार्यालय केज हे बदली निकषात बसत नाहीत व संघटनेची तक्रार संदिग्ध स्वरूपाची असल्याने सदर तक्रारी अर्ज निकाली काढण्यात आला असल्याबाबत संबंधितांना जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांचेस्तरावरून कळविण्यात आलेले आहे.

---

## राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील शाळेतील शिक्षकांना सातव्या वेतन आयोगानुसार प्रोत्साहन भत्ता मिळणेबाबत

**(२९) ५६६४ (१३-११-२०२०) डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील शाळांव्यतिरिक्त इतर विभागातील कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता मिळतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संस्थांतर्गत असणारे कर्मचारी या प्रोत्साहन भत्त्यापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने निर्णय घेऊन या क्षेत्रातील शिक्षकांना ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**अॅड. के.सी.पाडवी (०१-१२-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

आदिवासी उपयोजना क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्याना (संस्थांतर्गत आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यासह) सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय, दिनांक ६/०८/२००२ अन्वये ५ व्या वेतन आयोगानुसार मुळ वेतनाच्या १५% (किमान रुपये २००/- व कमाल रुपये १५००/-) या दराने प्रोत्साहन भत्ता दिला जातो.

(३) प्रोत्साहन भत्त्यात सुधारणा करण्याची बाब सामान्य प्रशासन विभागाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कापूस खरेदीत बोगस नोंदी करुन गैरव्यवहार केल्याबाबत

**(३०) ५६८७ (१३-११-२०२०) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयात सन २०१९-२०२० मध्ये कापूस उत्पादकांच्या ऑनलाईन नोंदी करुन कापसाची खरेदी करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी उत्पन्न बाजार समिती, ग्रेडर व जिनिंग मालक यांनी संगनमत करुन बोगस नोंदी घेऊन गैरव्यवहार केल्यामुळे औरंगाबाद तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी बोगस नोंदी रद्द केल्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदरहू गैरव्यवहाराला आळा घालण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०२-१२-२०२०) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

औरंगाबाद जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ आणि भारतीय कपास निगम (सीसीआय) यांचेमार्फत पैठण, गंगापूर, फुलंब्री, सिल्लोड, कन्नड व वैजापूर या तालुक्यामध्ये हंगाम २०१९-२०२० मध्ये कापूस खरेदी केंद्र चालू करण्यात आली होती. कोविड-१९ या महामारीच्या कारणास्तव राज्यात टाळेबंदी घोषित करण्यापर्यंत म्हणजे, दिनांक २३/३/२०२० पर्यंत सर्व संबंधित कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी ऑफलाईन पध्दतीने नोंदणी करुन हमी दराने कापूस खरेदी केलेला होता. केंद्र शासनाने टाळेबंदीच्या काळात हमीभावाने खरेदीस मान्यता दिल्यानंतर दिनांक २७/४/२०२० पासून पुन्हा कापूस खरेदी सुरु करण्यात आली. कोविड-१९ च्या अनुषंगाने शेतकऱ्यांचा सर्व कापूस मोजणी करणे व खरेदी केंद्रावर गर्दी होऊ नये म्हणून सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी वाहने

प्रत्यक्ष केंद्रावर न आणता, ऑनलाईन नोंदणी करण्याचे शेतकऱ्यांना आवाहन केले होते. तथापि, फक्त कृषी उत्पन्न बाजार समिती, पैठण यांनी ऑनलाईन नोंदणी केली होती. उर्वरित कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी ऑफलाईन नोंदणीव्दारेच खरेदी केलेली आहे.

(२) हे खरे नाही.

जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी दिनांक २९/५/२०२० रोजी आदेश देऊन तालुकानिहाय किती शेतकऱ्यांकडे कापूस शिल्लक आहे, हे स्पष्ट व्हावे यासाठी कापूस उत्पादक शेतकऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन तपासणी/पडताळणी करण्यासाठी तहसिलदार, सहाय्यक निबंधक, ग्रामसेवक, तलाठी व गटसचिव यांची नेमणूक केली होती. त्यानुसार कापूस शिल्लक असलेल्या शेतकऱ्यांच्या नोंदीनुसार संपूर्ण कापूस खरेदी करण्यात आलेला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गेवराई (जि.बीड) तालुक्यातील गोदावरी नदीपात्रातून अवैधरित्या वाळू उपसा सुरु असल्याबाबत

**(३१) ५६९७ (११-११-२०२०) श्री.विनायकराव मेटे : तारांकित प्रश्न क्रमांक १९७५ ला दिनांक १२ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) तालुक्यातील गोदावरी नदीपात्रातून वाळू माफिया क्रेनच्या सहाय्याने अवैधरित्या वाळू उपसा करीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैधरित्या वाळू उपसा करुन पर्यावरणाला हानी पोहोचविणाऱ्या वाळू माफियांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२७-११-२०२०) :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील घरेलू कामगारांच्या कल्याणकारी योजनाधीन आर्थिक तरतूदीमध्ये वाढ करण्याबाबत

**(३२) ५७२९ (१३-११-२०२०) श्री.संजय दौंड, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, डॉ.सुधीर तांबे, श्री.अरुणकाका जगताप, श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बांधकाम कामगार व इतर कामगार यांचे धर्तीवर घरेलू कामगारांची स्वतंत्र नवीन नोंदणी व नुतनीकरण करण्यात येत नसल्याचे माहे जून, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील घरेलु कामगारांची संख्या विचारात घेता घरेलु कामगार कल्याण मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या जनश्री विमा योजनेंतर्गत मिळणारी लाभार्थी रक्कम तसेच घरेलू कामगारांच्या पाल्यास शिक्षा सहयोग योजना, विदेशी भाषा प्रशिक्षण, पदविका व पदवी अभ्यास, महिला लाभार्थ्यांस प्रसुती लाभाच्या तरतूदी या योजनेंतर्गत मिळणारी रक्कम अत्यंत तुंटपुंज्या स्वरुपाची असल्यामुळे त्यामध्ये वाढ करण्यात यावी अशी मागणी घरेलू कामगार संघटनांनी शासनाकडे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घरेलू महिला कामगारांच्या सामाजिक सुरक्षिततेसंदर्भात शासनाने कायदा करावा, घरेलू कामगारांच्या आरोग्य संरक्षणासाठी राज्य कामगार विमा योजना लागू करावी व वृध्द काम महिलांना देशाच्या सकल उत्पादनातील ३ टक्के रक्कम घरकामगारांच्या पेन्शनसाठी वेगळी काढावी व तातडीने ३००० रुपये पेन्शन लागू करावी अशाही मागण्या दिनांक १८ जून, २०१९ रोजी वा त्यासुमारास झालेल्या घरेलू कामगार हक्क परिषदेमार्फत

करण्यात येऊन दिनांक २० जून, २०१९ रोजी वा त्यासुमारास मुंबईतील आझाद मैदान येथे कामगार हक्क परिषद आयोजित करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच माहे मार्च, २०२० पासून ते लॉकडाऊनच्या समाप्ती काळात कामाअभावी घरी राहावे लागलेल्या घरेलू कामगारांना विशेष आर्थिक मदत देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०३-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही, घरेलू कामगारांची नोंदणी व नुतनीकरण करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

राष्ट्रीय घर कामगार कल्याण संस्थेने दिनांक ४ जून, २०१९ रोजी आझाद मैदान पोलीस ठाणे, मुंबई यांच्याकडे दिलेल्या निवेदनानुसार दिनांक २० जून, २०१९ रोजी घरेलू कामगारांचे आंदोलन झाले होते. त्याच्या निवेदनात महाराष्ट्र राज्य घर कामगार कल्याण मंडळाची पुनर्रचना करण्यात यावी, घर कामगारांना किमान वेतन कायद्यात आणावे, घर कामगारांना पेन्शन कायद्यात आणावे अशा मागण्या केल्या होत्या.

(४) घरेलू कामगारांना पेन्शनकरिता प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजनेचा लाभ घेता येणे शक्य आहे. लॉकडाऊनच्या काळात राज्याच्या उत्पन्नात घट झाली. त्यामुळे खर्चाचे प्राधान्यक्रम विचारात घेऊन, त्यानुसार निधी उपलब्ध झाल्यास, त्याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेणे शक्य होईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कळवा (जि.ठाणे) परिसरातील घोलाईनगर येथील अनधिकृत बांधकामावरील कारवाई पथकावर हल्ला केल्याबाबत

**(३३) ५७३० (१३-११-२०२०) श्री.संजय दौंड, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवा (जि.ठाणे) परिसरातील घोलाईनगर येथील राखीव वनक्षेत्रातील अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यास गेलेल्या वन अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पथकावर तेथील अतिक्रमणधारकांनी दिनांक २८ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास केलेल्या हल्ल्यात दोन वनपालांसह वनमजूर गंभीररित्या जखमी झाल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलिसांत गुन्हा नोंदविण्यात आला असून पोलिसांनी केवळ गुन्हा नोंदविण्याखेरीज कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वनसंरक्षणासाठी सक्रिय असणाऱ्या वन अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्वसंरक्षणासाठी शासनामार्फत सुरक्षा साधने पुरविली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अतिक्रमणधारकांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड (०१-१२-२०२०) :** (१) ठाणे वन परिक्षेत्रातील कळवा, घोलाईनगर मौजे पारसिक राखीव वन स.क्र. १९३ (जुना स.क्र.९३/अ) मध्ये दिनांक २८ मे, २०२० रोजी अतिक्रमण करुन घर बांधण्याचे काम सुरु असल्याचे क्षेत्रिय कर्मचारी गस्त घालत असताना निदर्शनास आले. सदर बांधकाम थांबविण्याची कार्यवाही सुरु केली असता, एका अतिक्रमणधारकाने तेथील स्थानिक लोकांना गोळा करुन दोन वनपालांसह वनमजूर यांच्यावर प्राणघातक हल्ला केला.

(२) सदर प्रकरणी कळवा पोलीस स्टेशन येथे दिनांक २८/०५/२०२० अन्वये भारतीय दंड संहिता, कलम ३५३, ३३२, ३३६, ३२४, ५०४, ५०६ व ३४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्यामध्ये सहभागी असणाऱ्या १ महिला आरोपीस दिनांक १/१०/२०२० रोजी अटक करण्यात आली आहे.

(३) वनसंरक्षणासाठी सक्रिय असणाऱ्या वन अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्वसंरक्षणासाठी शासनामार्फत वाहने, शिरस्त्राने, बंदूक इत्यादी सुरक्षा साधने पुरविली जातात.

(४) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून, चौकशीत कळवा मौजे पारसिक राखीव वन स.क्र. १९३ (जुना स.क्र. ९३/अ) मध्ये वन जमिनीवर अतिक्रमण करुन अनधिकृतरित्या घराचे बांधकाम केल्याचे आढळून आल्याने अतिक्रमणधारकाविरुध्द कळवा पोलीस स्टेशनमध्ये रा.गु.क्र.ई.०२/२०२०-२१, दिनांक २८/०५/२०२० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच सदर प्रकरणी कळवा पोलीस स्टेशन येथे भारतीय दंड संहिता, कलम ३५३, ३३२, ३३६, ३२४, ५०४, ५०६ व ३४ अंतर्गत एफआयआर नं. २५१ दिनांक २८/०५/२०२० अन्वये फिर्याद दाखल करण्यात आलेली आहे. सदरचे अतिक्रमण वन विभागाव्दारे पोलीस बंदोबस्तात दिनांक १०/०६/२०२० रोजी निष्कासित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मनोर (जि.पालघर) येथील आदिवासींची आर्थिक फसवणूक करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(३४) ५७४४ (१३-११-२०२०) श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनोर (जि.पालघर) येथे लॉकडाऊनमुळे आदिवासींवर उपासमारीची वेळ आल्याने लोकप्रतिनिधी व आदिवासी कार्यकर्त्यांनी शासनाकडे खावटी कर्ज अनुदान योजना सुरु करण्याची मागणी माहे जुलै, २०२० मध्ये वा

त्यादरम्यान केली असून ठाणे जिल्हयात लॉकडाऊनच्या काळात आदिवासींना खावटीची रक्कम न मिळाल्याचा निषेध करीत आदिवासी प्रकल्प कार्यालयाबाहेर आंदोलन केले असून खावटी योजनेच्या धोरणाप्रमाणे भूकेचा काळ हा जून ते सप्टेंबर असतानाही खावटी योजनेचा लाभ ठाणे सह रायगड, पालघर आणि नाशिक व उर्वरित आदिवासी बहुल जिल्हयात वेळेत देण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१३-२०१४ मध्ये करण्यात आलेल्या खावटी अनुदान योजनेचे पुनरुज्जीवन करुन सन २०२०-२०२१ या वर्षासाठी सदर योजना सुरु करण्याचा निर्णय माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्यादरम्यानच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेऊन त्याबाबत शासन निर्णय, दिनांक ०९ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निर्गमित करण्यात आला असून या योजनेनुसार पात्र आदिवासी कुटुंबांना प्रति कुटुंब चार हजार रुपयांपैकी दोन हजार रुपये अन्नधान्य वस्तुस्वरुपात तर दोन हजार रुपये लाभार्थ्यांच्या बँक अथवा टपाल खात्यात वितरित करण्यात येणार असल्याचे सदर शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात सन २०११ च्या जनगणनेनुसार १ कोटी ५ लाख १० हजार एवढी आदिवासी लोकसंख्या असताना या योजनेसाठी तरतूद केलेली ४८६ कोटी ही रक्कम अपुरी पडणार असल्यामुळे १० लाखापेक्षा अधिक कुटुंबे या योजनेच्या लाभापासून वंचित राहणार असल्याने या योजनेच्या निकषात बदल करण्यात यावा अथवा ही योजना सर्व आदिवासींना सरसकट लागू करावी, अशी मागणी श्रमजीवी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी शासनाकडे केली असल्याचे दिनांक १६ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजना कागदावर असताना मनोर व पालघरमध्ये काही आदिवासी संघटनांकडून अर्ज भरण्याच्या नावाने आदिवासींकडून पैसे घेतले असल्याने याबाबत आदिवासींमध्ये संभ्रम निर्माण झाला असून उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आदिवासींची आर्थिक फसवणूक करणाऱ्या

दोषींवर कोणती कारवाई केली तसेच या योजनेच्या निकषात बदल करुन ही योजना सर्व आदिवासींना सरसकट लागू करुन इतर शैक्षणिक सुविधा मुलांना मध्यान्ह भोजन आहार व प्रलंबित आहार भत्ता देण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड.के.सी.पाडवी (०३-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

या योजनेंतर्गत लाभार्थ्यांकडून अर्ज भरुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) खावटी कर्ज योजना ही सन २०१३-२०१४ पासून बंद होती. सद्य:स्थितीत राज्यात उद्‌भवलेल्या कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर खावटी कर्ज योजना ही खावटी अनुदान योजनेमध्ये रुपांतरीत करुन राज्यात कोरोना विषूणुच्या पार्श्वभूमीवर उद्‌भवलेल्या परिस्थितीमध्ये अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना सहाय्य करण्यासाठी खावटी अनुदान योजना सुरु करण्याबाबत मा.मंत्रिमंडळाने दिनांक १२ ऑगस्ट, २०२० रोजीच्या मा.मंत्रिमंडळ बैठकीमध्ये निर्णय घेतलेला आहे. त्याबाबतचा शासन निर्णय दिनांक ०९/०९/२०२० रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. तसेच योजना राबविण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना दिनांक ३०/०९/२०२० रोजी निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

(४) आदिवासी भागातील आदिवासी कुटुंबांना खावटी योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी पैसे घेतल्याबाबतच्या तक्रारी शासनास प्राप्त झाल्या असून, त्याबाबत आयुक्त, आदिवासी विकास व व्यवस्थापकीय संचालक, आदिवासी विकास महामंडळ यांना त्याबाबत कायदेशीर कार्यवाही करण्याचे निर्देश दिनांक २७/१०/२०२० रोजीच्या पत्रान्वये दिलेले आहेत.

सद्य:स्थितीत खावटी अनुदान योजना सरसकट लागू करण्याबाबत शासनस्तरावर कोणताही विचार नाही. तसेच इतर शैक्षणिक सुविधा, मुलांना मध्यान्ह भोजन आहार व प्रलंबित आहार भत्ता देण्याबाबतची बाब या विभागाशी संबंधित नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळत नसल्याबाबत

**(३५) ५७६१ (१३-११-२०२०) श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील संजय गांधी निराधार योजनेच्या १०००० पेक्षा जास्त लाभार्थ्यांना माहे जानेवारी, २०२० पासून आजतागायत मासिक अनुदान वर्ग करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर शहरात शासनाची संजय गांधी निराधार योजना समिती मार्च, २०२० पासून स्थापन झाली नसून सदर समिती कार्यरत नसताना तहसिलदार यांनी सदर बैठका घ्याव्यात असा नियम आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेची/समितीची कार्यवाही होण्यासाठी तसेच या योजनेचे लाभार्थी असण्याऱ्या वयोवृध्द व्यक्ती तसेच विधवा महिला यांना लाभ मिळवून देण्याकरिता नागपूर येथील लोकप्रतिनिधींनी शासनस्तरावर लेखी तक्रार निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू लाभार्थ्यांना लाभ मिळणेबाबत तसेच योजनेची/समितीची कार्यवाही होण्याबाबत शासनस्तरावर कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (२७-११-२०२०) :** (१) नाही.

(२) होय.

(३) प्रस्तुत योजनेबाबत शासनस्तरावर निवेदन दिलेले नसून जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडे निवेदन दिले आहे.

(४) नागपूर शहर संजय गांधी समितीच्या तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली १२ बैठका घेण्यात आल्या आहेत. त्यामध्ये एकूण २४३७ अर्जांपैकी १३१५ प्रकरणे मंजूर, २८४ प्रकरणे नामंजूर व उर्वरित ८३८ प्रकरणे त्रुटीपूर्ततेकरीता प्रलंबित आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील आश्रमशाळांना कला व क्रीडा शिक्षक पद पुर्णवेळ भरणेबाबत

**(३६) ५७९७ (१३-११-२०२०) श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आश्रमशाळांना कला व क्रीडा शिक्षक हे पुर्णवेळ पद नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्रीडा शिक्षकांचे पद पुर्णवेळ नसल्यामुळे विदयार्थ्यांच्या कलागुंणाना वाव मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कला व क्रीडा शिक्षकांचे पदनिर्मितीचे धोरण काय आहे,

(४) असल्यास, शासकीय आश्रमशाळांमध्ये २१७ कला (कार्यानुभव) शिक्षक व ३३१ क्रीडा शिक्षक/क्रीडा मार्गदर्शकाची (Coach) भरण्यात आले असून उर्वरीत शाळांमध्ये सुरु असलेल्या भरतीची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय तसेच सदरहू भरतीच्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील आश्रमशाळांना कला व क्रीडा शिक्षक पुर्णवेळ पद भरण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (२७-११-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) राज्यातील प्रत्येक शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या कला व क्रीडा गुणांना वाव मिळण्याकरिता आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णय दिनांक १३/०६/२०१९ नुसार शासकीय आश्रमशाळेसाठी कला (कार्यानुभव) शिक्षक कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबत शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय दिनांक ०६/०३/२०१८ नुसार कंत्राटी पध्दतीने क्रीडा शिक्षक/क्रीडा मार्गदर्शकाची (Coach) नियुक्ती करणेसाठी मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना त्यांच्या रुचिनुसार, प्राविण्यानुसार व त्यांच्यातील कलागुणांचा विकास करण्यासाठी वरील शिक्षकांची/मार्गदर्शकांची नेमणूक केली जाते. त्यामुळे सदरची शिक्षकांची/मार्गदर्शकांची पदे कायस्वरुपी भरण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(४) शासकीय आश्रमशाळांमध्ये २१७ कला (कार्यानुभव) शिक्षक व ३३१ क्रीडा शिक्षक/ क्रीडा मार्गदर्शकाची (Coach) भरण्यात आले आहेत. उर्वरीत शाळांमध्ये चालु शैक्षणिक वर्षात कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे भरती करण्यात आलेली नाही.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी पुस्तके खरेदीत अपहार झाल्याबाबत

**(३७) ५८६५ (१७-११-२०२०) श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाने सिडको एन-६ आणि जिन्सी येथील शासकीय मुला-मुलींच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी सन २०१४-२०१५, २०१५-२०१६ व २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षासाठी रुपये ४७ लाख रकमेची पुस्तके खरेदी केल्याचे दाखविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन आदेशानुसार तीन लाख रुपयापेक्षा अधिक रकमेची पुस्तके खरेदी करण्यासाठी निविदा काढणे बंधनकारक असतांना ही पुस्तके प्रत्यक्षात खरेदी न करताच विनानिविदा खरेदी केल्याचे दाखवून त्यामध्ये समाविष्ट असणाऱ्या ११ पुस्तके विक्रेत्यांसह शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी ४७ लाख रुपयांचा अपहार करुन शासनाची फसवणूक केली असल्याचे दिनांक ३० जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित ११ जणांसह वसतिगृहे प्रकल्प अधिकारी तसेच पुस्तके विक्रेते व पुरवठादार यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड.के.सी.पाडवी (०२-१२-२०२०) :** (१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांतर्गत आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह सिडको एन-६ नसून सिडको एन-८ (बहादरपुरा) व जिन्सी येथील वसतिगृह ही दोन्ही वसतिगृहे सिडको एन-८, औरंगाबाद येथील एकाच शासकीय इमारतीमध्ये कार्यरत आहेत. सदर वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी सन २०१४-२०१५, २०१५-२०१६ व २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षासाठी रुपये १२,१९,६४३/- इतक्या रकमेची पुस्तके खरेदी करण्यात आलेली आहेत.
(२), (३) व (४) याबाबत अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांच्या दिनांक १३/११/२०१९ रोजीच्या आदेशान्वये प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करुन पुस्तके खरेदीबाबतची चौकशी करण्यात आली असून सदर चौकशीअंती खरेदीचे तत्वे व नियमावली, वित्तीय अधिकार इत्यादीचे उल्लंघन करुन केलेली खरेदी ही नियमबाह्य दिसून येते असा अहवाल चौकशी समितीने सादर केला आहे.

पुस्तके खरेदीच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद मध्ये क्रिमिनल रिट पिटीशन क्रमांक १२१०/२०१९ दाखल केली असता मा.उच्च न्यायालयाने त्यांच्या दिनांक १४/०२/२०२० रोजीच्या न्यायनिर्णयानुसार पोलीस स्टेशन सिडको, औरंगाबाद येथे तत्कालीन ११ अधिकारी व कर्मचारी व ६ पुस्तक पुरवठादार यांचेविरुध्द दिनांक २७/०२/२०२० रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पोलीस स्टेशन सिडको, औरंगाबाद यांचेकडून पुढील तपास सुरु आहे.

उक्त ११ अधिकाऱ्यांपैकी श्री.गजानन नारायण फुंडे, तत्कालीन प्रकल्प अधिकारी, औरंगाबाद व श्री.शिवकुमार हनुमंतराव घेवारे, पुस्तक पुरवठादार यांना दिनांक २९/०७/२०२० रोजी अटक करण्यात आली असून सध्या ते जामीनावर आहेत. उर्वरीत ८ अधिकारी/कर्मचारी व ५ पुस्तक पुरवठादार यांना

मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी अंतरिम जामीन मंजूर केलेला आहे. त्यांचे अटकपूर्व जामीनावर मा.उच्च न्यायालयात सुनावणी दिनांक १ व २ डिसेंबर, २०२० रोजी ठेवली आहे. तसेच उर्वरीत २ कर्मचारी यांचेवर अद्यापपावेतो कार्यवाही करण्यात आलेली नाही.

---

## खाजगी अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षकांना रद्द केलेला प्रोत्साहन भत्ता, वेतन अन्य सर्व मागण्या मंजुर करण्याबाबत

**(३८) ५८७५ (१३-११-२०२०) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत ९७७ खाजगी अनुदानित आश्रमशाळा सुरु असून या आश्रमशाळेच्या शिक्षक कर्मचाऱ्यांना ३-३ महिने वेतन मिळत नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२० च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आश्रमशाळांतील शिक्षक कर्मचाऱ्यांच्या अनेक मागण्या शासनाकडे प्रलंबित असतानाही आदिवासी, नक्षलग्रस्त भागात कार्यरत शासकीय, निमशासकीय शाळांमधील शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांना मुळ वेतनाच्या १५ टक्के इतका कमाल १५०० रुपये इतका मिळणारा प्रोत्साहन भत्ता विजाभज आश्रमशाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांना इतर मागास बहुजन कल्याण विभागाने रद्द केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आश्रमशाळेतील शिक्षकांना रद्द केलेला प्रोत्साहन भत्ता पूर्ववत चालू करुन वेळेवर वेतन अन्य सर्व मागण्या मंजुर करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (०३-१२-२०२०) :** (१) नाही.

(२) व (३) विजाभज प्रवर्गाच्या आश्रमशाळेतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी बदली पात्र नाही. त्यामुळे आदिवासी आणि नक्षलग्रस्त भागात कार्यरत असलेल्या विजाभज प्रवर्गाच्या आश्रमशाळेतील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना एकस्तर पदोन्नती/प्रोस्ताहन भत्ता अनुज्ञेय नसल्याबाबत सामान्य प्रशासन विभाग, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग तसेच वित्त विभागाने अभिप्राय दिलेले आहे.

उपरोक्त अभिप्राय विचारात घेऊन इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या अंतर्गत असलेल्या प्राथमिक / माध्यमिक / उच्च माध्यमिक / विद्यानिकेतन / ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठीच्या आश्रमशाळांमध्ये कार्यरत असलेल्या नक्षलग्रस्त / आदिवासी क्षेत्रात असणाऱ्या आश्रमशाळांतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता / एकस्तर पदोन्नती लागू नसल्याबाबत दिनांक १३ मार्च, २०२० रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. तसेच त्यांची अंमलबजावणी करणेबाबत दिनांक १३ ऑक्टोबर, २०२० च्या परिपत्रकानुसार सर्व क्षेत्रिय कार्यालयांना निर्देश देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे रोहित्र (डीपी) ना दुरुस्त असल्याबाबत

**(३९) ६०६४ (१३-११-२०२०) श्री.रमेश कराड :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे १२४ पेक्षा जास्त रोहित्रचे (डीपी) नुकसान झाले असून यात सहा रोहित्र झुकली तर ११६ रोहित्र नादुरूस्त झाली आहेत असे स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारीव्दारे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, उच्चदाब वाहिनीचे १९७ लघुदाब वाहिनीचे ३९१ विजेचे खांब अतिवृष्टीत आडवे झाले आहेत या व्यवस्थेच्या दुरुस्तीसाठी महावितरणने रुपये ४८ लाख ७० हजार दुरुस्ती निधीची मागणी केली असून त्यांचा अहवाल प्रशासनाकडे पाठविण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर रोहित्राची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.नितिन राऊत (०३-१२-२०२०) :** (१) हे खरे आहे, दिनांक १३ ऑक्टोबर, २०२० ते १८ ऑक्टोबर, २०२० या कालावधीत ११६ रोहित्रांचे नुकसान झालेले असून ०६ रोहित्र झुकलेली आहेत.
(२) हे खरे आहे, माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसान दुरुस्तीसाठी महावितरणच्या लातूर मंडल कार्यालयाकडून रुपये ४८.७० लक्ष इतक्या निधीची मागणी केलेली आहे.
(३) सद्य:स्थितीला अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या उच्चदाब व लघुदाब वाहिनीचे सर्व पोल उभे करण्यात आले आहेत. तसेच नादुरुस्त रोहित्रे दुरुस्त करुन विद्युत पुरवठा दिनांक २० नोव्हेंबर २०२० पुर्वी पुर्ववत करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गोकुंदा (ता.किनवट, जि.नांदेड) येथे सागवान जप्त करण्यात आल्याबाबत

**(४०) ६०७९ (१३-११-२०२०) श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.मोहनराव कदम, श्री.शरद रणपिसे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोकुंदा (ता.किनवट, जि.नांदेड) येथे सागवान तस्करीसाठी मोठया प्रमाणावर सागवानाची तोड होत असून वन विभागाने येथे ऑटोसह सुमारे ५० हजाराचे अवैध सागवान जप्त केल्याचे दिनांक ३० ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सागवान तस्करी करणाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड (०१-१२-२०२०) :** (१) होय.

या प्रकरणी सागी नग ०५ (०.१२१३ घ.मी. अंदाजे किंमत रुपये ७५५२/-) माल जप्त करण्यात आला.

(२) सदर प्रकरणी भारतीय वन अधिनियम १९२७ अन्वये प्रथम गुन्हा दाखल करण्यात आला असून चौकशी सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आळंदी-पंढरपूर-मोहोळ राष्ट्रीय महामार्गाकरीता संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत

**(४१) ६०९८ (२०-११-२०२०) श्री.प्रशांत परिचारक, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आळंदी-पंढरपूर-मोहोळ राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९६५ च्या पालखी महामार्गासाठी अधिग्रहीत करण्यात आलेल्या जमिनींचा मोबदला शेतकऱ्यांना मिळाला नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूसंपादन करणाऱ्या अधिकाऱ्यांकडून झालेल्या चुकांमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्यामुळे शेतकऱ्यांनी १० दिवस साखळी उपोषण केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अधिग्रहीत करण्यात आलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (०४-१२-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

श्री.संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग क्र.९६५ हा आळंदी-पुणे-पंढरपूर-मोहोळ असा आहे. यामध्ये माळशिरस तालुक्यातील २० गावे व मोहोळ व पंढरपूर तालुक्यातील १९ गावे अशी एकूण ३९ गावे असून महामार्ग

भूसंपादनाची चौपदरीकरणाची प्रक्रिया राबवली जात आहे. एकूण निवाड्याची रक्कम रुपये ९७०.८२ कोटी इतकी आहे. सदर निवाड्यास प्रकल्प संचालक, राष्ट्रीय महामार्ग यांचेकडून मंजुरी प्राप्त आहे. आज अखेर बाधित खातेदार यांना नुकसान भरपाई रक्कम ६५२.९२ कोटी पात्र शेतकऱ्यांना वाटप करणेत आली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

मौजे माळशिरस गावातील बाधित होणाऱ्या भूधारकांनी दिनांक २०/०८/२०२० पासून दहा दिवस साखळी उपोषण केले होते.

(३) सद्य:स्थितीत संबंधित जमिनींचे मालक शेतकरी यांनी मौजे माळशिरस मध्ये संपादित होणाऱ्या जमिनींचे निवाड्या विरोधात राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ कलम ३(G)(५) अन्वये लवाद तथा अपर जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडे एकूण ३८ अर्ज सादर केले असून अर्जावर उपविभागीय अधिकारी, माळशिरस तथा सक्षम प्राधिकारी यांनी म्हणणे दिलेले असून सदर बाबींवर सुनावणी सुरु आहे. सबब, आज रोजी सदर बाब ही न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सामाजिक न्याय विभागांतर्गत अनुसूचित जातीतील लाभार्थ्यांना रमाई आवास योजनेतून घरकुल अनुदान मिळणेबाबत

**(४२) ६१०२ (१३-११-२०२०) श्री.प्रशांत परिचारक, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जातीतील लाभार्थ्यांना रमाई आवास योजनेतून घरकुल अनुदान देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संपूर्ण राज्यात संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत सदर योजना राबविण्यात येत असून सोलापूर जिल्ह्यातील सदरील योजनेतील लाभार्थ्यांना अनुदान वाटप करण्यात प्रशासनाकडून विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सोलापूर जिल्हयातील सर्व लाभार्थ्यांनी कागदपत्रांची पूर्तता करून देखील काही लाभार्थ्यांचे पहिला हप्ता तर काही लाभार्थ्यांचे दुसरा व तिसऱ्या हप्त्याचे अनुदान प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरील लाभार्थींना अनुदान देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (०३-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील व्यक्ती/कुटुंब याकरीता रमाई आवास घरकुल योजना राबविण्यात येते.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पीत करण्यात आलेली रुपये ५००.०० कोटी इतक्या निधीतून कोविड-१९ ची परिस्थितीचा विचार करता वित्त विभागाने या योजनेकरीता रुपये ३००.०० कोटी इतका निधी वर्ग करण्यात आला असून सदरील निधी वितरित करण्यात आला आहे. तसेच, या योजनेसाठी तातडीची बाब म्हणून डिसेंबर, २०२० च्या हिवाळी अधिवेशनात रुपये ५००.०० कोटी (अक्षरी रूपये पाचशे कोटी फक्त) इतका निधी पुरक मागणीव्दारे उपलब्ध करून देण्याची विनंती करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोरेगाव (जि.सातारा) तालुका कृषी कार्यालयाच्या शासकीय इमारतीच्या दुरुस्तीकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४३) ६११० (११-११-२०२०) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरेगाव (जि.सातारा) तालुका कृषी कार्यालयाच्या शासकीय इमारतीची दुरवस्था झाल्याने पावसाळ्यात इमारतीचे स्लॅब गळती होत असून गत दोन वर्षापासून धोकादायक शासकीय इमारतीमध्ये कार्यालयीन अभिलेखे सुरक्षित ठेवणे गैरसोयीचे होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १९ एप्रिल, २०२० रोजी सदर कार्यालयाच्या अभिलेखा कक्षाची मागील भिंत पडली असल्याची दुर्घटना घडली असून त्यामुळे इमारतीस ठिकठिकाणी तडे गेल्याचे व इमारतीच्या भिंतीमध्ये इलेक्ट्रिक करंट जाणवत असल्याने अधिकारी व कर्मचारी यांचे जिवितास धोका निर्माण झाल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर धोकादायक स्थितीतील कार्यालयाच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करण्यात यावा, अशी मागणी तालुका कृषी अधिकारी यांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे माहे मे, २०२० पासून मागणी करीत असल्याचे दिनांक १९ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोरेगाव तालुका कृषी कार्यालयाच्या शासकीय इमारतीच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२७-११-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) तालुका कृषी अधिकारी, कोरेगाव यांनी इमारत दुरुस्ती खर्चाचे अंदाजपत्रक सादर करण्याची विनंती उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कोरेगाव यांना तसेच विभागीय कृषी सहसंचालक कोल्हापूर यांना दिनांक २०/०४/२०२० रोजीच्या पत्राव्दारे केलेली आहे. तालुका कृषी अधिकारी, कोरेगाव कार्यालयास इमारत उपलब्ध करुन देण्याबाबत मा.विधानसभा सदस्यांनी मागणी केल्याबाबतची बातमी दै.पुढारी वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे.

(४) कोरेगाव (जि.सातारा) तालुका कृषी कार्यालयाच्या शासकीय इमारतीची दुरुस्ती करण्यासाठी दुरुस्ती खर्चाचे अंदाजपत्रक देणेबाबत दिनांक २०/०४/२०२० रोजीच्या पत्रान्वये सार्वजनिक बांधकाम विभागास विनंती करण्यात आली. सार्वजनिक बांधकाम विभागाने दिनांक ०३/०७/२०२० रोजीच्या

पत्रान्वये सदर इमारतीची दुरुस्ती करणे अवघड व जास्त खर्चिक असल्याचे कळविले आहे. त्यामुळे तालुका कृषी अधिकारी, कोरेगाव कार्यालयासाठी पर्यायी इमारत शोधून तेथे कार्यालय स्थलांतरित करण्यास विभागीय कृषी सहसंचालक, कोल्हापूर यांनी सूचित केले आहे. त्यानुसार कार्यालयासाठी पर्यायी इमारत उपलब्ध करुन देण्यास सार्वजनिक बांधकाम विभागास कळविले आहे, तसेच पर्यायी व्यवस्था म्हणून पंचायत समितीच्या ताब्यात असलेली सर्व्हे क्र.१०३ मधील बचत भवनची इमारत तालुका कृषी अधिकारी, कोरेगाव कार्यालयास उपलब्ध करुन देणेबाबत ठराव पंचायत समितीने मंजूर करुन जिल्हा परिषद, सातारा यांचेकडे मान्यतेसाठी सादर केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कृषी विभागातील गैरआदिवासींची पदे रिक्त करुन खऱ्या आदिवासी उमेदवारांची भरती करण्याबाबत

**(४४) ६२९६ (२०-११-२०२०) श्री.निलय नाईक, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गैरआदिवासी कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करुन तेथे खऱ्या आदिवासींची पद भरती करण्याचा मा.सर्वोच्च न्यायालयाचा दिनांक ६ जुलै, २०१७ रोजीचा आदेश असतांना अमरावतीच्या कृषी सहसंचालकांनी सदरहू आदेशाचे पालन न करता अमरावती व नागपूरच्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालयातील आदिवासी उमेदवारांचे नियुक्तीपत्र वर्षभरापासून अडवून ठेवल्याची बाब माहितीच्या अधिकारात उघड झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयाने अशा ९ पदांची माहिती शासनाला दिलीच नाही, तसेच कृषी सहायक व सेवक यांची ४ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक २१ डिसेंबर, २०१९ रोजी राज्य शासनाने गैर आदिवासींनी बळकावलेल्या जागा आदिवासींमधून भरण्यासाठी कालबध्द कार्यक्रम जाहीर केला, परंतु राज्यातील शासकीय कार्यालयातील गैरआदिवासींची पदे रिक्त करुन खऱ्या आदिवासी उमेदवारांची पदे भरण्यात आली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गैरआदिवासींची पदे रिक्त करून खऱ्या आदिवासी उमेदवारांच्या नियुक्तीने ही पदे भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, आदिवासी संघटनांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे तसेच बिरसा क्रांती दलाने व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालक तसेच सचिव, कृषी विभाग यांचेकडे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गैरआदिवासींनी बळकावलेली पदे रिक्त करुन खऱ्या आदिवासी उमेदवारांच्या नियुक्तीने ही पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०३-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

विभागीय कृषी सहसंचालक, अमरावती कार्यालयाच्या अधिनस्त कार्यरत असणाऱ्या अनुसूचित जमातीच्या एकूण ६ कर्मचाऱ्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेले आहे. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक २१/१२/२०१९ मधील सूचनांनुसार उक्त ६ कर्मचाऱ्यांच्या सेवा अधिसंख्य पदांवर वर्ग करण्यात आलेल्या आहेत.

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, अमरावती व नागपूर हे कृषी विभागाच्या अधिनस्त नाही. त्यामुळे तेथील आदिवासी उमेदवारांचे नियुक्तीपत्र वर्षभरापासून अडवून ठेवल्याची बाब विभागीय कृषी सहसंचालक, अमरावती कार्यालयाशी संबंधित नाही.

(२), (३), (४) व (५) विभागीय कृषी सहसंचालक, अमरावती कार्यालयाने २ कृषी पर्यवेक्षक, १ कृषी सहाय्यक, १ अनुरेखक, १ कनिष्ठ लिपीक व १ वीजतंत्री अशा एकूण ६ कर्मचाऱ्यांच्या सेवा अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या आहेत. त्यामुळे ती रिक्त आहेत. तसेच त्यांचेसाठी अधिसंख्य पदनिर्मितीचा

प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे. अधिसंख्य करण्यात आलेल्या पदांमधील अनुरेखक संवर्गाची पदे पुढील आदेशापर्यंत न भरण्याच्या सूचना दिनांक ०५ जून, २००९ अन्वये दिलेल्या आहेत. तेव्हापासून अनुरेखक संवर्गातील पदे भरण्यात आलेली नाहीत. सन २००९ च्या सुधारित आकृतिबंधानुसार वीजतंत्री हे पद अतिरीक्त ठरविण्यात आल्यामुळे सदर पद भरता येणार नाही. कनिष्ठ लिपीक पदावरील कर्मचारी पदोन्नतीने शिपाई संवर्गातून पदोन्नत झालेला असल्याने शिपाई हे मूळ पद प्रचलित नियमानुसार भरण्यात येणार आहे. कृषी सहाय्यकांची अनुसूचित जमातीसाठी मंजूर असलेली सर्व पदे भरलेली आहेत. कृषी पर्यवेक्षकांची सरळसेवा कोट्यातील पदे सुधारित आकृतिबंधानुसार मर्यादित विभागीय परीक्षेव्दारे भरावयाची आहेत. गैरआदिवासींची पदे रिक्त करुन खऱ्या आदिवासी उमेदवारांच्या नियुक्तीने ही पदे भरण्याबाबत प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उंब्रज (ता.कराड, जि.सातारा) येथील भूकंपग्रस्त/पूरग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(४५) ४६९९३ (०५-०७-२०१९) श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उंब्रज (ता.कराड, जि.सातारा) येथे दिनांक ११/१२/१९६७ रोजी झालेल्या भूकंप व त्यानंतर सन १९७६ मध्ये कृष्णा नदीला आलेला महापूर यामुळे या नदीकाठावरील मागासवर्गीय व इतर ग्रामस्थांचे घरे पडून वाहून जाऊन नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या भूकंपग्रस्त/पूरग्रस्त यांच्या पुनर्वसनासाठी उंब्रज गाव परिसरातील क्षेत्र मंजूर करुन १५०० चौ.फु. प्रत्येकी याप्रमाणे ११६ भूखंडाची आखणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भूकंपग्रस्त/पूरग्रस्त यादीमध्ये पिडीत भूखंडधारकांची नावे असून देखील पहिल्या यादीतील ५ भूखंडधारक व दुसऱ्या यादीतील २७ भूखंडधारक असे एकूण ३२ पिडीत भूखंडधारकांना शासनामार्फत मंजूर झालेले त्यांचे भूखंड हस्तांतरीत झाले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पिडीत भूखंडधारकाना त्यांच्या भूखंडाचा ७/१२ वर नावे नोंद घेऊन कब्जा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (०४-११-२०२०) :** (१) होय.
(२) होय.
(३) भूकंपग्रस्त/पूरग्रस्त यादीतील ज्या ५ कुटुंबियांना प्लॉटचे वाटप करण्यात आलेले होते त्यांचे प्लॉटवर इतर भूखंड धारकांनी अतिक्रमण केले असून त्याठिकाणी त्यांनी पक्क्या स्वरुपाच्या घरांचे बांधकाम करुन त्याठिकाणी ते वास्तव्य करीत आहेत. तसेच सदर भूखंड धारकांच्या नोंदी ग्रामपंचायत नमुना ८ चे उताऱ्यावर घेण्यात आलेली असून त्यांना १८ नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. तसेच एकूण ९० जणांना भूखंड मंजूर करण्यात आले मात्र त्याऐवजी ८५ भूखंड धारकांनी त्यांना मंजूर प्लॉटक्षेत्रापेक्षा कमी जास्त क्षेत्रामध्ये अथवा मंजूर प्लॉटऐवजी इतर प्लॉटमध्ये घरे, गोटे, इत्यादींचे बांधकाम केल्याचे दिसून येते. तसेच सदरचे ३२ (२७+५) पिडीत भूखंडधारक हे त्यांचे मूळ ठिकाणी वास्तव्य करुन रहात आहेत.
(४) मोजणी नकाशामध्ये बरेच ठिकाणी प्लॉट धारकांनी अतिक्रमण करुन घरे बांधलेली आहेत. त्यामुळे उर्वरीत भूखंड धारकांना कब्जे देणेबाबत कार्यवाही करता आलेली नाही.
(५) सद्य:स्थितीत मोजणी नकाशामध्ये बरेच ठिकाणी प्लॉट धारकांना अतिक्रमण करुन घरे बांधलेली आहेत. त्यामुळे उर्वरित भूखंड धारकांना कब्जे देणेबाबतची कारवाई करता आलेली नाही.

---

# मिरा-भाईंदर शहरातील बहुतांश आरक्षणे महापालिकेने विकसित केली नसल्याबाबत

**(४६) ४७१६७ (१२-०७-२०१९) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर शहरातील बहुतांश आरक्षणे महापालिकेने विकसित केली नसल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये प्रशासनाच्या संकेतस्थळावरील माहितीवरुन निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९९७ साली शहराचा विकास आराखडा मंजूर होवून आज २० वर्षे होवूनही मिरा-भाईंदर शहरातील ३३४ पैकी केवळ १०७ आरक्षणे महापालिकेने विकसित केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने मिरा-भाईंदरच्या नगररचना विभागाच्या गैरकारभारासंबंधी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-११-२०२०) :** (१), (२) व (३) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकूण ३३४ आरक्षणे असून त्यापैकी १०७ आरक्षणे महानगरपालिकेने विकसित केलेली आहेत, हे खरे आहे.

उर्वरित आरक्षणे ही खाजगी मालकीची असून, मालकीबाबत कौटुंबिक व अंतर्गत वाद असल्याने अशा स्वरूपाच्या जागा विकास हक्क प्रमाणपत्राव्दारे महानगरपालिकेस हस्तांतरीत करून घेता येत नाहीत.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या तीन बाजूने समुद्र व खाडी किनारा असल्याने बहुतांश भाग हा CRZ व कांदळवनाने बाधित आहेत. परिणामी अशी आरक्षणे हस्तांतरीत झाली नसल्याने विकसित करता येत नाहीत.

खाजगी आरक्षणाखालील जागा विकास हक्क प्रमाणपत्राच्या माध्यमातून हस्तांतरीत करण्याकरीता महानगरपालिकास्तरावर कार्यवाही सुरू असल्याचे मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

# अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्हयात बेरोजगार तरुणांच्या संख्येत वाढ झाल्याबाबत

**(४७) ४७२३४ (०६-०७-२०१९) श्री.गोपिकिशन बाजोरीया, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३५ जिल्हयात ४४ लाख ५६ हजार ३६६ बेरोजगार युवकांनी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता केंद्रावर रोजगारासाठी नोंदणी केल्याची बाब माहे एप्रिल, २०१९ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे, नागपूर, औरंगाबाद, अकोला, वाशिम, बुलढाणा, ठाणे, नाशिक, मुंबई, जळगाव, अहमदनगर, लातूर, बीड, सोलापूर, कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्हयांमध्ये सुशिक्षित बेरोजगार युवकांची संख्या तब्बल लाखांच्या घरात गेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पदवी, पदविका आणि इतर सुशिक्षित बेरोजगार युवकांना रोजगार मिळण्याकरिता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक (१८-०२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

राज्यातील ३५ जिल्हयातील कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रात नोंदणी केलेल्या उमेदवारांचा माहे एप्रिल, २०१९ चा नोंदणीपट ४६,०८,३७२ इतका आहे.

(२) जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रात अकोला व वाशिम कार्यालयात नोंदणी केलेल्या उमेदवारांचा नोंदणीपट अनुक्रमे ८८,३७२ व ४७,६६७ इतका असून उर्वरित पुणे, नागपूर, औरंगाबाद, बुलढाणा, ठाणे, नाशिक, मुंबई, जळगांव, अहमदनगर, लातूर, बीड, सोलापूर, कोल्हापूर, सांगली, सातारा या जिल्हयामधील उमेदवारांच्या नोंदणीपटांची संख्या लाखाच्यावर गेलेली आहे.

(३) कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रे ही राज्य शासनाची रोजगार व स्वयंरोजगारासाठी मदत व मार्गदर्शन करण्याकरिता असलेली यंत्रणा आहे. रोजगाराची निर्मिती या यंत्रणेचे कार्यकक्षेतील विषय नाही.

तथापि, बेरोजगारीचा प्रश्न सोडविण्याकरिता शासन प्रयत्नशील असून, बेरोजगारी दूर होण्याकरिता (१) रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांचे संगणकीकरण, (२) बेरोजगार उमेदवारांसाठी ग्रंथालय सदृश अभ्यासिका निर्माण करणे, (३) रोजगार मेळावे आयोजित करणे, (४) बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था स्थापन करणे, (५) आदिवासी उमेदवारांसाठी रोजगार व स्वयंरोजगार प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र, (६) रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम (ईपीपी), (७) महाराष्ट्र राज्यात व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र स्थापन करणे, (८) प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान या योजना राबविण्यात येतात तर स्वयंरोजगारासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत (अ) वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, (ब) गट कर्ज व्याज परतावा योजना, (क) गट प्रकल्प योजना या योजना राबविण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सगरोळी (जि.परभणी) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(४८) ४७२९७ (०५-०७-२०१९) श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सगरोळी (जि.परभणी) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात गत पंधरा दिवसापासून वैद्यकीय अधिकारी येत नसल्यामुळे उक्त आरोग्य केंद्रात कर्मचाऱ्यांकडून रुग्णांची तपासणी केली जात नसल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आरोग्य केंद्रातील श्रेणी-१ व श्रेणी-२ ही दोन्ही पदे रिक्त असल्याने आरोग्य केंद्रातील कर्मचारी आरोग्य सहायक कौशल्य हे रुग्णांची तपासणी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१७-११-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

सदर प्राथमिक आरोग्य केंद्रातील मंजुर असलेली दोन्ही वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गातील पदे भरलेली असून सदर वैद्यकीय अधिकाऱ्यांनी रुग्णांना आरोग्य सेवा दिलेली आहे.
(३) आरोग्य सहाय्यक यांचेकडून रुग्ण तपासणी करण्यात आली नसल्याने कार्यवाही करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोतवाल खुर्द व कोंढवी (ता.पोलादपूर, जि.रायगड) गावांमध्ये दरड प्रतिबंधक उपाययोजना करण्याबाबत

**(४९) ४७५८७ (०५-०७-२०१९) श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक ४३५९२ ला दिनांक १३ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोतवाल खुर्द व कोंढवी (ता.पोलादपूर, जि.रायगड) गावांमध्ये सन २००५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमध्ये दरड कोसळून जिवित व वित्तहानी झाल्यानंतर दरड प्रतिबंधक उपाययोजना करण्याबाबत अप्पर मुख्य सचिव, मदत पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन यांना दिनांक १/०१/२०१९ रोजी वा त्यासुमारास लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कार्यवाही केली आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, यासंदर्भात जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, अलिबाग-रायगड यांचेमार्फत माहे नोव्हेंबर, २०१८ मध्ये भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागाच्या अहवालानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड यांनी गावांमध्ये संरक्षक भिंत बांधण्याच्या कामाची अंदाजपत्रके सादर करण्यात आली असून अंदाजपत्रकानुसार निधीची उपलब्धता करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (०४-११-२०२०) :** (१) होय.

(२), (३), (४) व (५) राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (NDMA), भारत सरकार यांनी दिनांक २७ ते ३१ ऑगस्ट, २०१८ रोजी आय.आय.टी. मंडी, हिमाचल प्रदेश येथे दरडप्रवण राज्यांशी संबंधित “Landslide Mitigation & Detailed Project Report (DPR) Preparation” प्रशिक्षण आयोजित केले होते. सदर प्रशिक्षणास रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा व सांगली येथील कार्यकारी अभियंत्यांना पाठविण्यात आले होते. प्रशिक्षणानंतर सर्व संबंधितांना Detailed Project Report (DPR) तयार करुन ते राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (NDMA) ला पाठविण्याकरिता सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. सर्व संबंधित जिल्हयांनी त्यानुसार (DPR) सादर केले असून सद्य:स्थितीत शासनाकडे रुपये ४०.४१ (रूपये चाळीस कोटी एकेचाळीस लक्ष फक्त) चे एकूण ३८ (DPR) प्राप्त झाले आहेत. यात मौजे कोतवाल खुर्द व कोंढवी यांचाही समावेश आहे.

सदर Detailed Project Report (DPR) राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (NDMA), भारत सरकार यांना शासनाच्या दिनांक ०३/०१/२०२० चे पत्रानुसार पाठविण्यात आले असून सदर Detailed Project Report (DPR) चे Technical evaluation राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (NDMA), भारत सरकार यांचेकडून करण्यात येत आहे.

---

## राज्यात आदर्श अंगणवाडी योजनांची अंमलबजावणी करण्याबाबत

**(५०) ४७९७५ (०५-०७-२०१९) श्री.नरेंद्र दराडे, श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाड्यांमधील ० ते ६ वर्ष वयोगटातील बालकांच्या आरोग्याची तपासणी, पूर्व प्राथमिक शिक्षण आणि पोषण आहार वाटपात अत्याधुनिकरण साधून सध्या अस्तित्वात असलेल्या ६८ हजार अंगणवाडयांचे रुपांतर आदर्श अंगणवाडीमध्ये करण्याचा निर्णय घेतला असून एक वर्ष होऊनही त्याची अंमलबजावणी झाली नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेसाठी सन २०१७-२०१८ मध्ये पाच हजार अंगणवाडयांसाठी ८४ कोटी ५० लाख रुपयांची आवश्यकता असताना केवळ पाच कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ७३ लाख बालकांच्या भवितव्याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन आवश्यक त्या निधीची तरतूद करुन आदर्श अंगणवाडी योजनेची सक्षमपणे अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (०९-११-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षात रुपये ४.३८ कोटी तरतुद करण्यात आलेली होती. शासनाने दिनांक १०/१/२०१९ च्या पत्रान्वये आदर्श अंगणवाडी योजनेसाठी ई-निविदा प्रसिध्द करण्यास मान्यता दिलेली होती. तथापि, यानुषंगाने निविदा दस्ताऐवज तयार करुन पुनश्च शासनाच्या मान्यतेस पाठविण्यास आलेले होते. दरम्यानच्या कालावधीत वित्त विभागाने दिनांक ३१/१/२०१९ रोजी निर्गमित केलेल्या शासन परिपत्रकात दिनांक १ फेब्रुवारी, २०१९ नंतर कोणत्याही खरेदीच्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देता येणार नाही अथवा प्रशासकीय मान्यता प्राप्त असेल तरीही निविदा

प्रसिध्द करता येणार नाही, असे कळविण्यात आले होते. त्यानंतर लोकसभा सार्वत्रिक निवडणूकांची आचारसंहिता लागू झाल्याकारणास्तव “आदर्श अंगणवाडी योजना” साठी निविदा प्रकाशित करण्यात आलेली नव्हती.

सदरची निविदा सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात प्रकाशित करण्यात आलेली आहे.

(३) व (४) सन २०१९-२०२० या वर्षात एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत राज्यातील अंगणवाडी केंद्रांचे आदर्श अंगणवाडी केंद्रात रुपांतर करणेसाठी “स्मार्ट अंगणवाडी किट” साठी निविदा प्रक्रिया राबवून L१ निविदाधारक मे.टेक्नोक्राफ्ट असोसिएटस, मुंबई यांचेकडून प्रति संच रुपये १,६४,८६४.८८ (सर्व करासहित) प्रमाणे ३०३२ अंगणवाडी केंद्रांकरीता स्मार्ट अंगणवाडी किट अंगणवाडीस्तरावर पुरवठा करण्यासाठी शासनामार्फत मान्यता देण्यात आलेली होती. त्यानुसार या कार्यालयामार्फत संबंधित पुरवठाधारकास पुरवठा करण्यास आदेशित करण्यात आले होते. तथापि, संबंधित निविदाधारकाने सादर केलेले Provisional Turnover Certificate नुसारची २०१८-२०१९ मधील आर्थिक उलाढाल लेखा परिक्षणाअंती कमी झालेली असल्याने सदर निविदाधारक तांत्रिकदृष्टया अपात्र ठरल्याने शासनस्तरावरुन सदरची निविदा रद्द करणे व नव्याने अल्प कालावधीसाठी निविदा प्रकाशित करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार आयुक्तालय स्तरावरुन सदरची निविदा रद्द करण्यात आलेली असून दिनांक २८/१/२०२० रोजी नव्याने अल्प कालावधीसाठीची फेर निविदा प्रकाशित करण्यात आलेली आहे.

दिनांक २८/१/२०२० रोजी प्रकाशित केलेल्या फेर निविदेअंती एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत राज्यातील अंगणवाडी केंद्रांचे आदर्श अंगणवाडी केंद्रात रुपांतर करणेसाठी “स्मार्ट अंगणवाडी किट” प्रति संच रु १,५६,२२०.२० (सर्व करासहित) प्रमाणे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात एकूण १२८० एवढया संच पुरवठा करणेसाठी रुपये १९,९९,६१,८५६/- (अक्षरी रुपये एकोणीस कोटी नव्व्यान्नव लाख एकसष्ठ हजार आठशे छपन्न फक्त) एवढया खर्चास महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय, क्र.एबावि-२०१९/प्र.क्र.९७(भाग-२)/का.६, दिनांक २७/०३/२०२० अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार या कार्यालयाचे पुरवठा आदेश क्र.एबाविसेयो/Smart AWC

Kits/पुरवठा/२०२०/१३३२, दिनांक २७/०३/२०२० अन्वये मे.मफतलाल इंडस्ट्रिज लि., मुंबई यांना पुरवठा करण्यास आदेशित करण्यात आले आहे. सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाच्या शेवटी पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आलेला असल्याने सदर पुरवठा आदेशानुसार मे.मफतलाल इंडस्ट्रिज लि., मुंबई यांचेमार्फत "स्मार्ट अंगणवाडी किट" चा पुरवठा अंगणवाडीस्तरावर चालू आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेंद्र भागवत**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.